
२२६३

माझे
वडील
तीर्थरूप
विठ्ठल
गोपीनाथ
भालेकर
ह्यांस
अत्यादरपूर्वक....


पप्पु



BVBK-0402263



भाळकोबा





वाचनालय शाखा.
वा. क्र. 2263 दिनांक 22/7/..
BVBK-0402263

**फा**र फार वर्षांपूर्वीची गोष्ट!

एक होता....

कोण?

ओळखा पाहू!

नाहीच ना ओळखता येत?

एक होता....

राजा?

छट्, अं हं!

एक होता....

एक होता लाकडाचा ढलपा. ढलपा म्हणजे तुकडा. हा तुकडा काही विशेष चांगला नव्हता. अगदी नेहमीसारखा. शेगडी पेटवायला वापरतो ना, तसला.

कसा ते माहीत नाही, पण एकदा हा लाकडाचा तुकडा एका सुताराच्या दुकानात आला. सुताराचे नाव होते अंतू. पण लोक त्याला म्हणत, लाल्या सुतार. कारण त्याच्या नाकाचा शेंडा सदैव लाल असे.

लाल्या सुताराने जेव्हा तो लाकडाचा ढलपा पाहिला, तेव्हा त्याला

फार आनंद झाला. लाल्या सुतार स्वतःशीच म्हणाला, "हा लाकडाचा तुकडा अगदी ऐन वेळी माझ्या हाताला लागलाय! माझ्या छोट्या टेबलाचा पाय मोडलाय, तेव्हा आता ह्याच लाकडाच्या तुकड्याचा पाय तयार करावा आणि त्या टेबलाला लावावा."

म्हणून मग जास्त वेळ न घालवता लाल्या सुताराने आपली धारदार कुऱ्हाड काढली. अगदी धारदार कुऱ्हाड. लाल्या सुतार मनाशी विचार करू लागला, 'आता प्रथम कुऱ्हाडीने ह्या लाकडाच्या तुकड्याला तासावा आणि मग त्याला टेबलाच्या पायाचा आकार द्यावा.' तेव्हा मग लाल्या सुताराने आपल्या कुऱ्हाडीला पुन्हा एकदा धार लावली आणि तिने तो लाकडाचा तुकडा तासायला सुरुवात करणार, इतक्यात तो थबकला. त्याच्या हातातली कुऱ्हाड तशीच राहिली. कारण त्याला गदी माणसाच्या आवाजासारखा आवाज ऐकू येऊ लागला,

"सुतारदादा, सुतारदादा, माझ्यावर जोराने कुऱ्हाड चालवू नकोस रे!"

लाल्या सुताराने आश्चर्याने आपल्या दुकानात चारी बाजूंना नजर फिरवली, पण त्याला कोठेच कोणी दिसेना. त्याने आपल्या बाकड्या-खाली पाहिले. कोणी नाही. त्याने आपल्या नेहमीच कुलूप लावलेल्या कपाटात पाहिले. कोणी नाही. त्याने दुकानाबाहेर येऊन पाहिले. कोणी नाही. कोठेच कोणी नाही.

मग आवाज कोठून आला? लाल्या सुतार डोके खाजवू लागला. "हं, असंच झालं असावं. मला आवाजाचा नुसता भासच झाला असावा." लाल्या सुतार स्वतःशीच बडबडू लागला. "नाहीतर काय, सारीकडे पाहिलं आणि कुणीच कुठे नाही. भास नाहीतर काय? चला, आपण आपलं काम आटपू या पटापट."

आणि असे म्हणून लाल्या सुताराने आपली धारदार कुऱ्हाड पुन्हा उचलली आणि ती त्या लाकडाच्या तुकड्यावर मारली.

"अरे अरे, सुतारदादा, मला तू केवढी जखम केलीस!" पुन्हा तोच आवाज लाल्या सुताराच्या कानी पडला.

ह्या वेळी मात्र लाल्या सुतार चांगलाच चमकला. भीतीने त्याचे डोळे विस्फारले, तोंडाने आ वासला आणि जीभ हनुवटीवर लोंबू लागली.

लाल्या सुतार क्षणभर अगदी स्तब्ध उभा राहिला. त्याला काय होत आहे हे कळेना. त्याने पुन्हा आपली नजर सगळीकडे फिरविली. अगदी नीट सारे निरखून पाहिले. सरतेशेवटी त्याची नजर पुढ्यातच पडलेल्या लाकडाच्या तुकड्यावर जाऊन खिळली.

लाल्या सुताराला वाटले, 'हा लाकडाचा तुकडाच बोलत नसेल ना? पण छे, बोलूनचालून हा लाकडाचा तुकडा. साध्या, जळाऊ लाकडाचा तुकडा. चुलीला लावला तर उकळ्या फुटतील पाण्याला. मग आवाज कुठून आला? ह्या लाकडाच्या तुकड्यात तर कुणी लपून बसला नसेल ना? असेना का कुणी. असलाच तर त्याचीच कंबख्ती. पुन्हा आपला मी कामाला लागतो कसा.'

असा विचार करून लाल्या सुताराने आपल्या पुढ्यात पडलेला तो लाकडाचा तुकडा उचलला. नीट निरखून पाहिला आणि मग त्याला काय झाले कोणास ठाऊक, लाल्या सुतार तो लाकडाचा तुकडा जोर-जोराने भिंतीवर आपटू लागला.

चारसहा वेळा तो लाकडाचा तुकडा भिंतीवर आपटल्यावर लाल्या सुतार थांबला, काही आवाज येतोय का ते पाहायला. लाल्या सुतार दोन मिनिटे थांबला, आवाज नाही. पाच मिनिटे थांबला, आवाज नाही. दहा मिनिटे थांबला, आवाज नाही.

"आत्ता समजलो!" लाल्या सुतार हसत हसत, आपले डोके खाजवीत उद्गारला, "मला त्या आवाजाचा भासच झाला असावा. चल, पुन्हा कामाला लागू या."

लाल्या सुताराने कुऱ्हाड बाजूला ठेवली, हातात रंधा घेतला आणि

त्या रंध्याने तो लाकडाचा तुकडा गुळगुळीत करायला त्याने सुरुवात केली. तो रंधा त्या लाकडाच्या तुकड्यावरून जसा पुढे-मागे होऊ लागला, तसे कोणीतरी हसत आहे असे लाल्या सुताराला वाटू लागले आणि त्याच्या कानावर शब्द पडले,

"अरे सुतारदादा, थांब, थांब. मला किती गुदगुल्या करतोयस!"

अगदी विजेचा धक्का लागावा तसा लाल्या सुतार धाडकन् जमिनीवर पडला आणि मग काही वेळाने तो उठून बसला, तेव्हा तो इतका बदलून गेला होता की त्याला तुम्ही कदाचित् ओळखूही शकला नसता. त्याचे मूळचे लाल नाकही भीतीने काळेनिळे झाले होते, इतका भेदरून गेला होता तो!

## २

लाल्या सुतार भानावर आला तेव्हा त्याच्या दरवाजावर 'टक् टक्' आवाज आला!

"कोण आहे?" लाल्या सुताराने बसल्याबसल्याच विचारले. "या आत. दरवाजा उघडा आहे."

दार उघडून एक म्हातारा आत आला. ह्या माणसाचे नाव होते

पप्पू

बाळकोबा. पण गावातील मुले त्याला चिडवीत, तेव्हा ती त्याला म्हणत, 'खारीकराव.' कारण तो खारकेसारखा सुरकुतलेला होता. ह्यामुळे तर बाळकोबा फारच रागवायचा.

"राम राम लालबा!" बाळकोबा आत येत म्हणाला, "काय चाललंय?"

काही नाही. सहज बसलोय." लाल्या सुताराने उत्तर दिलं. "पण बाळकोबा, आज तू इकडे कसा आलास?"

"कसा म्हणजे? पायांनी आलो." बाळकोबा म्हणाला, "माझं एक काम करशील का लालबा?"

"काम? कसलं काम?" लाल्या सुताराने विचारले.

"मला एक लाकडाचा तुकडा हवाय," बाळकोबा म्हणाला, "एक गंमत सुचलीय मला."

"गंमत? कसली गंमत?" लाल्या सुताराने पुन्हा विचारले.

"गंमतच आहे." बाळकोबा म्हणाला, "मला एक लाकडाचा तुकडा दे. मी त्या लाकडाच्या तुकड्याचा एक कळसूत्री बाहुला तयार करणार आहे. अगदी चांगला बोलणारा, नाचणारा बाहुला. हवेत उड्या मारणारा बाहुला. लाकडाचा कळसूत्री बाहुला."

"अरे, पण तू हा बाहुला तयार करून काय करणार आहेस?" लाल्या सुताराने मध्येच विचारले.

"काय करणार?" बाळकोबा मोठ्या अभिमानाने म्हणाला, "अरे लालबा, हा नाचणारा, बोलणारा, उड्या मारणारा बाहुला बनवून मी साऱ्या जगभर फिरणार. खूप पैसे मिळवणार. काय, कशी आहे माझी गंमत?"

"वा! फारच छान खारीकराव!" लाल्या सुताराने प्रथम ऐकलेलाच आवाज पुन्हा आला. लाल्या सुताराची तर घाबरगुंडी उडाली.

बाळकोबाने जेव्हा 'खारीकराव' हा शब्द ऐकला, तेव्हा तो एकदम

चिडला आणि लाल्या सुतारावर ओरडला, "तू मला खारीकराव का म्हणालास ?"

"कोण ? मी ?" लाल्या सुताराने विचारले.

"हो, हो, तू! तू म्हणालास मला खारीकराव !" बाळकोबा म्हणाला.

"मी तुला काहीच म्हणालो नाही." लाल्या सुताराने सांगितले.

"नाही, तूच म्हणालास मला खारीकराव!" बाळकोबाने आपलाच हेका पुढे चालवला.

"बरं, म्हणालो. मग ?"

"मग काय ? पण तू का म्हणालास ?"

"मी कधीच म्हणालो नाही."

"तूच म्हणालास."

"नाही."

"होय. तूच म्हणालास! लाल्या, तूच म्हणालास!" बाळकोबा म्हणाला.

"मी तोंडातून एक शब्दही काढला नाही." लाल्या सुताराने काहीही कबूल करायचे नाकारले. तोही हट्टाला पेटला.

आणि मग हो-ना हो-ना करता करता लाल्या सुतार आणि बाळकोबा अगदी हमरीतुमरीवर आले. दोघांनी एकमेकांचे केस ओढले. एकमेकांना खूप ओरबाडले. एकमेकांना खूप मारले.

काही वेळाने दमल्यावर, लाल्या सुतार आणि बाळकोबा दोघेही गप्प बसले. अगदी चिडीचूप. आणि मग लाल्या सुतार म्हणाला, "हं, बाळकोबा, आता काय पाहिजे तुला ?"

"मला एक लाकडाचा तुकडा पाहिजे." बाळकोबाने उत्तर दिले. "कळसूत्री बाहुला बनवायचा आहे मला. मग देतोस का मला एक लाकडाचा तुकडा, लालवा ?"

लाल्या सुताराने आपल्या पुढ्यातलाच बोलणारा लाकडाचा तुकडा

उचलला आणि तो बाळकोबाला देऊन टाकला. बाळकोबाही तो लाकडाचा तुकडा घेऊन मोठ्या आनंदाने घरी परतला.

बाळकोबा तो लाकडाचा तुकडा घेऊन गेल्यावर लाल्या सुताराच्या जिवात जीव आला. तो मनाशीच बोलू लागला, "काय अजब आहे पाहा! एवढासा लाकडाचा तुकडा, पण माणसासारखा बोलला!"

## ३

बाळकोबा एका जिन्याखाली राहात होता. त्याच्या खोलीत एक कुरकुरी खुर्ची, एक मोडके टेबल आणि एक डुगडुगणारी खाट होती. खोलीच्या समोरच्या भिंतीवर एका फुललेल्या शेगडीचे नुसते चित्र काढले होते. पण ती चित्रातली शेगडी अगदी एखाद्या खऱ्या, धगधगत्या शेगडीसारखी दिसत होती आणि त्या चित्रातल्या शेगडीवर काढली होती एक चहाची किटली. त्या किटलीतून धूर निघत असलेला दाखवला होता. अगदी खऱ्या धुरासारखा.

बाळकोबा घरी आला आणि लाल्या सुताराकडून आणलेल्या लाकडाच्या तुकड्याचा कळसूत्री बाहुला करण्याच्या कामगिरीला लागला आणि अगदी थोड्याच वेळात त्याने त्या लाकडाच्या तुकड्याचे एका कळसूत्री बाहुल्यात रूपांतर केले.

"काय बरं नाव द्यावं ह्या बाहुल्याला ?" बाळकोबा विचार करू लागला. "हं, असंच करावं. ह्या कळसूत्री बाहुल्याचं नाव ठेवावं पप्पू."

"पप्पू-पप्पू-पप्पू." बाळकोबा खूप मोठ्याने हसला. स्वतःवरच खूप झाला आणि मग त्या नादातच तो पप्पूला—त्या लाकडाच्या बाहुल्याला —हात, पाय वगैरे शरीराचे अवयव कोरू लागला.

प्रथम बाळकोबाने पप्पूला डोळे कोरले आणि काय आश्चर्य! डोळे कोरायचे काम पूर्ण होताच पप्पूचे कोरलेले डोळे हलू लागले!

डोळ्यांनंतर बाळकोबाने पप्पूचे नाक कोरले. अगदी चाफेकळीसारखे. पण गंमत अशी की बघता बघता ते नाक मोठे होऊ लागले. अगदी आपोआप. बिचारा बाळकोबा कानस घेऊन पप्पूचे नाक तासून कमी करू लागला, तरी ते वाढतच राहिले. बाळकोबा जोरजोराने पप्पूच्या नाकावर कानस फिरवू लागला. पण तो कानस जितक्या जोराने फिरवी तितक्याच जोराने पप्पूचे नाक वाढू लागले. शेवटी कंटाळून बाळकोबाने हातातली कानस खाली ठेवली. पप्पूचे नाक वाढायचे अपोआप थांबले.

नाकानंतर बाळकोबाने पप्पूला तोंड काढले. पण ओठांना चांगला आकार येण्यापूर्वीच पप्पूचे तोंड जोरजोराने हसू लागले आणि बाळ- बाची थट्टा करू लागले.

"हसू नकोस पप्पू" बाळकोबा रागावून म्हणाला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण पप्पू सारखा हसतच राहिला.

"हसू नकोस म्हणून सांगतो ना, पप्पू." बाळकोबा धमकीवजा आवाजात ओरडला, तेव्हा पप्पूचे हसणे एकदम थांबले आणि त्यां जीभ बाहेर काढली. पण बाळकोबाने तिकडे लक्ष दिलेच नाही. तं आपले काम करीतच राहिला.

तोंडानंतर बाळकोबाने पप्पूला हनुवटी कोरली. नंतर क्रमाने एक खांदे, पोट आणि हात काढले. बाळकोबाने पप्पूला हात काढताच, प आ पुढ्यातच असलेली हातोडी उचलली. बाळकोबाने हे पाहिले तेव्हाकपू





पप्पूला ओरडला, "अरे चोरा, मी तुला अजून नीट तयार केला नाही तोच मला हात दाखवतोस?" आणि असे म्हणून बाळकोबाने पप्पूच्या हातातली हातोडी काढून घेतली आणि बाजूला ठेवून दिली.

बाळकोबाने पप्पूला पाय काढले तेव्हा पटकन बाळकोबाच्या नाकावर पप्पूची लाथ बसली. बाळकोबा नाक चोळीत चोळीत म्हणू लागला, "वा, खासा न्याय! एखाद्याचं भलं करायला जावं, नि हे असं फळ भोगावं! मी स्वतःच पहिल्यांदा ह्याबाबत विचार करायला हवा होता. पण आता काय उपयोग? फार उशीर झाला. ह्या लाकडाच्या पप्पूला मी सारं काही दिलं. नाक, डोळे, हात, पाय आणि त्याच्या मोबदल्यात मला ह्याच्या लाथा मिळताहेत!"

बाळकोबा क्षणभर गप्प बसला आणि मग त्याने पुन्हा कामाला सुरुवात केली. त्याने पप्पूला बोटेही काढली आणि सरतेशेवटी त्या लाकडाच्या पप्पूला माणसाचे सारे अवयव दिले आहेत की नाही हे नीट पाहून मग बाळकोबाने त्याला जमिनीवर उभे केले.

"हं, आता चाल. टाक, एक एक पाऊल पुढे टाक," बाळकोबा पप्पूला म्हणाला. पण पप्पू एखाद्या खांबासारखा उभा होता. कारण त्याचे पाय अगदी कडक झाले होते. बाळकोबाच्या हे लक्षात आले तेव्हा त्याने पप्पूचा हात धरला आणि हळू हळू एक एक पाऊल टाकायला सुरुवात करताच, त्याचे पाय मोकळे झाले.

आपल्याला नीट चालता येऊ लागले हे पाहाताच पप्पूने बाळकोबाचा हात सोडला आणि तो मोकळेपणाने चालू लागला. चालता चालता तो खोलीत गरगर फिरू लागला. बाळकोबा कौतुकाने त्याच्याकडे पाहू लागला. पप्पू जोरजोराने गरगर धावू लागला आणि बघता बघता त्याने पटकन दरवाजाकडे धूम ठोकली आणि तेथून बाहेर पडून तो रस्त्यावरून पळू लागला—एखाद्या शर्यतीच्या घोड्यासारखा.

# ४

पप्पू खोलीबाहेर पळालेला पाहाताच बाळकोबाही त्याच्यामागे धावू लागला. अगदी जोरजोराने. पण तो काही बाळकोबाच्या हाती लागला नाही. कारण तो एखाद्या सशासारखा उड्या मारीत चालला होता. त्याचे लाकडी पाय जमिनीवर 'खट् खट्' असा आवाज करीत चालले होते.

"पकडा, पकडा पप्पूला," बाळकोबा पप्पूच्या मागे ओरडत पळत होता. पण कोणीही त्याच्या ओरडण्याकडे लक्ष दिले नाही.

रस्त्यातल्या लोकांनी पाहिले की-लाकडाचा पप्पू एखाद्या शर्यतीतल्या घोड्यासारखा पळतो आहे, तेव्हा तर त्यांनी तोंडातच बोटे घातली आणि मग ते सारे हसू लागले. हसले, हसले, इतके हसले, की त्यांची पोटे दुखू लागली.

बाळकोबाची आणि पप्पूची शर्यत चालूच होती. पप्पू पुढे आणि बाळकोबा मागे.

रस्त्यावरून एक पोलीसशिपाई चालला होता. त्याने जेव्हा पप्पूच्या पळण्याचा आवाज ऐकला, तेव्हा त्याला वाटले, जणू एखादा घोडाच



पप्पू

उधळला आहे. कारण पळताना पप्पूच्या लाकडी पायांचा सारखा 'खट् खट्' असा आवाज येत होता. म्हणून मोठ्या धैर्याने, तो पोलीसशिपाई, रस्त्याच्या मधोमध, आपले हात-पाय पसरून उभा राहिला.

पप्पू पळतच होता. त्याने दुरून जेव्हा पाहिले, की एक पोलीस-शिपाई रस्त्यात हात-पाय पसरून उभा आहे, तेव्हा त्याने ठरवले, की त्या शिपायाच्या पसरलेल्या पायांखालून जायचे. त्याप्रमाणे तो त्या शिपायाच्या पायांखालून जाण्याचा प्रयत्न करू लागला, तेव्हा त्या पोलीसशिपायाने आपले पाय पटकन जुळवले आणि पप्पूचे लांब नाक पकडून त्याला उभे केले.

काही वेळाने बाळकोबाही तेथे येऊन पोचला. त्याने पोलिसाला सारी हकीकत सांगितली, तेव्हा त्या पोलिसाने पप्पूला बाळकोबाच्या स्वाधीन केले. बाळकोबाने अगदी ठरवले, पप्पूचे चांगले कान उपटायचे त्याच्या ह्या बंडखोरीबद्दल. तेव्हा त्याने पप्पूच्या कानाला हात घातले. पण पप्पूचे कान होतेच कोठे? का? माहीत आहे? कारण बाळकोबाने गडबडीत पप्पूला कान काढलेच नव्हते.

म्हणून मग बाळकोबाने पप्पूची मानगूट पकडली आणि तो त्याला घेऊन घरी जाऊ लागला. रस्त्यांत तो पप्पूला धमकावत होता, "पप्पू, आता तू घरी चल, म्हणजे मग मी तुला सांगतो काय ते."

पप्पूने बाळकोबाचे हे शब्द ऐकले मात्र, त्याने तशीच रस्त्यात बैठक मारली आणि पुढे एक पाऊलही टाकायला तो तयार होईना! आणि मग काय झाले आहे हे पाहाण्याकरिता म्हणून रिकामटेकड्या लोकांचा एक घोळकाच पप्पूच्या आणि बाळकोबाच्या भोवती जमला. कोणी काही म्हणू लागले, कोणी काही!

"बिचारा!" त्यांच्यापैकी एक उद्गारला, "तो घरी जात नाही हेच ठीक. हा बाळकोबा त्याला कसा वागवील कुणास ठाऊक? मारीलसुद्धा त्याला!"

दुसरा एक म्हणाला, “ह्या बाळकोबा तसा चांगला माणूस. पण मुलांच्या बाबतीत फार वाईट. आपण जर ह्या मुलाला त्याच्या हातात दिला, तर तो तुकडे-तुकडे करील त्याचे!”

थोडक्यात, तेथे पप्पूबद्दल इतका गवगवा झाला की तेथे हजर असलेल्या पोलीसशिपायाने पप्पूला सोडून दिले आणि बाळकोबालाच तो पोलीसचौकीवर घेऊन जाऊ लागला. विचारा बाळकोबा! त्याचे काहीच चालेना. पोलीसशिपाई बाळकोबाला घेऊन जाऊ लागला, तेव्हा बाळकोबा पप्पूला उद्देशून म्हणाला, “अरे वेड्या पप्पू, मी तुला जन्म दिला आणि तू असा वागलास माझ्याशी! ठीक आहे? माझीच चूक झाली! हे असं होणार हे मला अगोदरच कळायला हवं होतं! बरं आहे.”

आणि मग तो पोलीसशिपाई बाळकोबाला घेऊन चौकीवर गेला.

आणि ह्या प्रसंगानंतर जे घडले ते सांगूनसुद्धा खरे वाटायचे नाही तुम्हांला! मी ते सारे तुम्हांला पुढल्या प्रकरणातच सांगेन.

## ५

**पो**लिसाने निरपराध बाळकोबाला पकडून नेले, तेव्हा लबाड पप्पू घरी लवकर परतण्यासाठी म्हणून, खूप जोराने पळू लागला. त्या गड-



पप्पू

बडीत त्याने काटेरी कुपणांवरूनसुद्धा उडया मारल्या—अगदी एखाद्या सशाप्रमाणे.

अशा रीतीने पप्पू घरी पोचला आणि खोलीत शिरून त्याने दार बंद करून घेतले. दरवाजाला नीट कडी लागली आहे हे त्याने नीट पाहिले आणि मग सुटकेचा एक दीर्घ निःश्वास टाकून तो विश्रांतीसाठी म्हणून जमिनीवरच आडवा झाला.

परंतु पप्पूला फार वेळ काही विसावा मिळाला नाही. कारण त्याला खोलीतच कशाचा तरी आवाज ऐकू येऊ लागला.

"किर्र किर्र किर्र किर्र."

"कोण ओरडतंय ?" पप्पूने रागाने विचारले.

"मी." कोणीतरी उत्तर दिले.

पप्पूने वळून पाहिले, तो त्याला एक मोठा रातकिडा भिंतीवर चढत असलेला दिसला.

"कोण रे तू ?" पप्पूने विचारले.

"मी रातकिडा," पप्पूला उत्तर मिळाले. "गेली शंभर वर्षं मी ह्या खोलीत राहात आहे."

"पण आज ही खोली माझी आहे," पप्पू दटावणीच्या सुरात म्हणाला, "तू आत्ताच्या आत्ता बाहेर निघून जा पाहू."

"जरा थांब." रातकिडा म्हणाला, "पप्पू, मला तुझ्या हिताच्या काही गोष्टी सांगायच्या आहेत, त्या सांगतो आणि मगच मी बाहेर जातो."

"हं, चल आटप. सांग लवकर. वेळ नाही मला फुकट घालवायला." पप्पूने दरडावले.

"हे बघ पप्पू," रातकिडा समजावणीच्या स्वरात म्हणाला, "जी मुलं आपल्या आईबापांना सोडून दूर जातात, त्यांच्यावर अनेक संकटं येतात. अशी दूर गेलेली मुलं ह्या जगात कधीच सुखी होत नाहीत

आणि काही काळानंतर मग त्यांना त्याचा पश्चात्ताप होतो."

"बरं, बरं, समजलं मला सारं!" पप्पूने त्याला वेडावीत म्हटले, "उद्या सकाळी मी इथून जाणार आहे, मला इथे मुळीच राहायचं नाही. मी इथे राहिलो तर इतर मुलांना जसा त्रास होतो, तसाच कदाचित मलाही होईल. मला शाळेत पाठवतील बळजबरीने. मला अभ्यास करावा लागेल. मी आपलं तुला म्हणून सांगतो; पण रातकिड्या, कुणाला बोलू नकोस. अरे, मला मुळी शाळेतच जायचं नाही. मी फुलपांखरांच्या मागे धावणार. झाडावर चढून पक्ष्यांची घरटी मोडणार. सारखा काही ना काही खेळत राहाणार."

रातकिड्याने पप्पूकडे क्षणभर पाहिले आणि मग तो म्हणाला, "अरे पप्पू, तू सारा वेळ असा हुंदडण्यात घालवलास तर लोक तुला हसतील. तुला मूर्ख म्हणतील."

"बरं, बरं, समजलं मला. तू नकोस मला उपदेश करायला." पप्पू त्या रातकिड्याच्या अंगावर ओरडला.

परंतु तो रातकिडा स्वभावतःच शांत आणि विचारी होता. त्याने पप्पूच्या त्या उद्धटपणाकडे लक्ष दिले नाही. तो पप्पूला आणखी समजावू लागला, "अरे पण, तुला शाळेत जायचं नसलं, तर मग तू एखादा धंदा तरी शीक. त्यामुळे तुझ्या पोटापाण्याचा प्रश्न तरी सुटेल."

पप्पूला रातकिड्याचे सांगणे पटेना. त्याला त्याचा राग येऊ लागला. त्यामुळेच पप्पू त्याच्यावर खेकसला, "बंद कर तुझी ही बडबड, रातकिड्या. मला कामबीम काही शिकायचं नाही किंवा धंदाही करायचा नाही. मी फक्त खूप खाणार, पिणार, खेळणार आणि झोपणार. अगदी खाद्या चैनी माणसासारखा वागणार, समजलास?"

"हो, समजलो," रातकिडा अगदी शांतपणे म्हणाला, "पण पप्पू, तू असाच वागलास तर मग एक तर तुला तुरुंगात तरी जावं लागेल, नाहीतर हॉस्पिटलात तरी पडावं लागेल."

"हे बघ रातकिड्या, तुझं तोंड बंद कर पाहू आता!" पप्पू अगदी चिडून म्हणाला, "आता तू मला आणखी राग येईल असं काही बोललास तर मग मात्र परिणाम वाईट होईल!"

"वेड्या पप्पू," रातकिडा अगदी विनवणीच्या स्वरात म्हणाला, "मला तुझ्याबद्दल फार वाईट वाटतं...."

"काही नको एवढं वाईट वाटायला," पप्पू मध्येच म्हणाला.

"अरे पप्पू, तू एक कळसुत्री बाहुला आहेस," रातकिडा म्हणाला, "आणि सगळ्यांत वाईट गोष्ट ही की तुझं डोकं लाकडाचं आहे."

रातकिड्याचे हे उद्गार ऐकताच पप्पू खवळला. त्याने तेथेच पडलेला लाकडी हातोडा उचलला आणि रातकिड्यावर भिरकावला.

रातकिड्याला मारावे असा पप्पूचा उद्देश नव्हता. पण दुर्दैवाने तो लाकडी हातोडा त्या रातकिड्याच्या डोक्यावर आदळला. बिचारा रातकिडा रडू लागला आणि त्याला जोराचा मार बसला होता तरी भिंतीवर चढू लागला.

## ६

काळोख पडला तेव्हा पप्पू घरात काही खायला आहे का ते पाहू लागला. पण त्याची निराशा झाली आणि जसजशी रात्र होऊ लागली तसतशी त्याला जास्तच भूक लागू लागली.

पप्पूने सारी खोली धुंडाळली, पण त्याला खायला काहीच मिळाले नाही. त्याची भूक तर सारखी वाढतच होती. पण खायला तर काहीच नव्हते घरात. तेव्हा तो जांभया देऊ लागला.

शेवटी अगदी निराशेने पप्पू रडू लागला. तो स्वतःशीच बोलत होता, "तो रातकिडा खरं तेच सांगत होता. मी माझ्या बाबांना सोडून पळून जाण्यात फार मोठी चूक केली. आता जर इथे माझे बाबा असते तर मी असा उपाशी बसलो असतो का? अरे देवा, काय भूक लागली आहे? पण...."

शेवटी घरात कोठेच काही न मिळाल्यामुळे, काहीतरी मिळवण्यासाठी म्हणून, पप्पूने बाहेर रस्त्यावर जायचे ठरवले. तो मनाशी म्हणाला, 'पाहू या. देईल एखादा धर्मी दाता आपल्याला खायला.'

बाहेर अगदी कडाक्याची थंडी पडली होती. मेघ गरजत होते. विजा चमकत होत्या. भयंकर वारा जोराने शीळ वाजवीत होता; धुळीचे ढग उडवीत होता. साऱ्या वृक्षांना वळवळवत होता.

पप्पूला विजेची आणि ढगांची फार भीती वाटत होती. पण पोटातील भूक तर त्याहूनही जास्त भेडसावीत होती आणि मग म्हणूनच त्याने खोलीचा दरवाजा उघडला आणि तो गावाच्या मार्गाला लागा. इतक्या जलदीने, इतक्या घाईने की त्याची जीभ, एखाद्या कुत्र्याच्या जिभेसारखी बाहेर लोंबू लागली.

पप्पू गावात पोचला, तेव्हा सर्वत्र अंधार आणि शांतता पसरली होती. गावातली सारी दुककाने वंद झाली होती. घरांची दारे बंद होती. खिडक्या बंद होत्या. रस्त्यात एखादा कुत्राही दिसत नव्हता. असे वाटत होते, जणू सारा गाव झोपी गेला आहे.

पप्पू त्या गावात सारीकडे वणवण हिंडला. पण अगदी शांत झोपी गेलेल्या गावाने त्याची मुळीच दखल घेतली नाही. फिरून फिरून तो अगदी वैतागला आणि परत आपल्या घरी आला—थंडीने काकडत, थरथरत

खोलीत पाय ठेवताच पप्पू तडक शेगडीजवळ गेला आणि शेकत बसला. पोटात भुकेचा डोंब उसळलेला आणि खायला तर काही नाही. अशा उदास स्थितीत तो तेथेच त्या शेगडीशी बसला आणि तशा त्या अवस्थेत झोप कधी लागली हे त्याला कळलेसुद्धा नाही.

पप्पू तसाच झोपला असताना त्याला स्वप्न पडले—आपले पाय शेगडीत जळत आहेत आणि सारे अंग भाजत आहे. तेव्हा तो जोराने किंचाळला आणि जागा होऊन पाहातो तो खरेच! आपले लाकडी पाय जळून खाक झाल्याचे त्याला दिसले.

पप्पूला फार वाईट वाटले. पण आता त्याला काही इलाज नव्हता. त्याच्या कुंभकर्णी झोपेत, शेगडीने त्याचे लाकडी पाय केव्हाच भस्मसात केले, हे त्याला कळलेसुद्धा नाही. तो आपल्या पाय नसलेल्या शरीराकडे तसाच पाहात बसला.

काही वेळाने पहाट झाली आणि खोलीच्या दारावर कोणीतरी, 'टक् टक्' करीत असल्याचे पप्पूच्या कानी पडले. पण त्याला उठवेना. तेव्हा त्याने बसल्या जागेवरूनच विचारले,

"कोण आहे?"

"मी." पप्पूला उत्तर मिळाले.

"मी म्हणजे कोण?" पप्पूने पुन्हा विचारले.

"मी बाळकोबा!"

# ७

बाळकोबाचा आवाज ऐकताच पप्पूने पुन्हा उठायचा प्रयत्न केला, पण त्याला पाय नसल्यामुळे जागेवरून हलता येईना.

"दार उघड पप्पू." बाळकोबा म्हणाला.

"मला उठता येत नाही, बाबा." पप्पू म्हणाला. "मी कसं दार उघडू?"

"का? काय झालं तुला?" बाळकोबाने विचारले.

"माझे पाय कुणी तरी खाऊन टाकलेत बाबा." पप्पूने उत्तर दिले.

"कुणी खाऊन टाकले?" बाळकोबाने विचारले.

"मांजराने." खोलीतच एका कोपऱ्यात बसलेल्या मांजराकडे पाहात पप्पू म्हणाला.

"पप्पू, मी सांगतो, दरवाजा उघड." बाळकोबा बाहेरून ओरडला, "नाहीतर मग आत आल्यावर तुला चांगलाच चोप देईन!"

"बाबा, खरंच मला उठता येत नाही." पप्पू गयावया करीत म्हणाला. "मला आता सारा जन्म गुडघ्यांवरच चालावं लागणार." आणि मग पप्पू रडायला लागला.

पप्पूचे रडणे हे सारे नाटक आहे असे समजून बाळकोबाने त्याला चांगलीच शिक्षा करायचे ठरवले. पण तो दार उघडत नाही असे पाहून, बाळकोबा खिडकी उघडून आत आला.

पप्पूने दार न उघडल्यामुळे बाळकोबा खूप रागावला होता. पण त्याने पप्पूची खरी स्थिती पाहिली, तेव्हा त्याला त्याची फार दया आली. त्याने त्याला प्रेमाने उचलून घेतले आणि त्याला कुरवाळीत म्हटले,

"बाळ पप्पू, तुझे पाय काय झाले?"

"बाबा, खरंच मला माहीत नाही." पप्पू अगदी अजीजीच्या स्वरात म्हणाला! "पण बाबा, मला एक गोष्ट आठवते. कालची रात्र फार भयंकर होती. ढग गडगडत होते. विजा चमकत होत्या आणि मला फार भूक लागली होती. मी खोलीत इथेच बसलो होतो. इतक्यात एक रातकिडा माझ्याशी बोलू लागला. त्याने मला दोष दिला आणि म्हणाला, 'तू दुर्वर्तनी आहेस आणि तुला अशीच शिक्षा व्हायला हवी.' तेव्हा मी रातकिड्याला म्हणालो, 'रातकिड्या, तोंड सांभाळून बोल.' तसा तो पुढे म्हणाला, 'मला तुझी फार दया येते ...आणि तुझं डोकं लाकडाचं आहे.' मग मात्र मी अत्यंत चिडलो आणि त्या रातकिड्याच्या अंगावर लाकडी हातोडा फेकून मारला. त्याला तो जोरात लागला. मग तो रातकिडा कुठे गेला कुणास ठाऊक. पण हा सारा त्याचाच दोष होता." पप्पू थोडा वेळ थांबला.

"बरं, मग पुढे?" बाळकोबाने विचारले.

"बाबा, मला फार भूक लागली होती." पप्पू पुढे सांगू लागला, "म्हणून मग मी गावात गेलो. सारा गाव हिंडलो, पण मला कुठे काही खायला मिळालं नाही. एव्हाना पाऊसही पडू लागला होता. त्यामुळे घरी परतताना मी पावसात चांगलाच भिजलो आणि थंडी वाजू नये म्हणून शेगडीजवळ बसलो होतो. तितक्यात मला झोप लागली आणि मग स्वप्न पडलं की माझे पाय जळून गेले आहेत. मी जागा झालो आणि

उठून पाहातो, तो खरंच तसंच झालं होतं. इतक्यात तुम्ही दारावर 'टक् टक्' केलंत." एवढे बोलून पप्पू थांबला आणि रडू लागला. इतक्या मोठ्याने की अगदी मैलभर लांबूनसुद्धा त्याचे रडणे ऐकू आले असते.

विचारा बाळ्कोबा. अगदी उदास नजरेने पप्पूकडे पाहात होता. एका साध्या लाकडाच्या तुकड्याचे त्याने पप्पूत रूपांतर केले होते. पण पप्पूने त्याचे न ऐकल्यामुळे तो पाय गमावून बसला होता. आता काय करावे, ह्या विचारात बाळ्कोबा असतानाच त्याच्या कानावर पप्पूचे शब्द पडले, "बाबा, मला फार भूक लागली आहे. काहीतरी खायला द्या ना."

बाळ्कोबाने आपल्या खिशातून आणलेली फळे त्याला दिली आणि पप्पूही आपले रडणे थांबवून ती फळे हसतहसत खाऊ लागला.

## ८

बाळ्कोबाने दिलेली सारी फळे खाऊन झाल्यावर मग पप्पू कुरकुरू लागला. "अं-अं-अं, बाबा मला नवे पाय हवेत."

पप्पूच्या खोडकरपणाबद्दल आपण त्याला चांगली शिक्षा करावी असे बाळ्कोबाला वाटत होते, म्हणूनच प्रथम त्याने त्याच्या कुरकुरीकडे दुर्लक्ष केले. पण तो जेव्हा आपला हेका सोडीना, तेव्हा थोड्याशा

रागानेच बाळकोबाने विचारले, "पप्पू, मी तुला नवे पाय कशाला द्यायचे? पुन्हा पळून जायलाच ना?" पप्पू रडत रडत म्हणाला, "काय म्हणून? मी अगदी शपथ घेऊन सांगतो बाबा, की मी आजपासून नीट वागेन. तुम्ही सांगाल तसा वागेन!"

"हो, मला माहीत आहे हे." बाळकोबा म्हणाला. "सारी मुलं आपल्याला हवी असलेली वस्तू मिळेपर्यंत असंच सांगतात."

"पण बाबा, मी इतर मुलांसारखा नाही," पप्पू म्हणाला. "मी त्यांच्यापेक्षा चांगला आहे आणि मी नेहमी खरं बोलतो. बाबा, मी अगदी शपथ घेऊन सांगतो, मी काहीतरी धंदा शिकेन आणि म्हातारपणी तुम्हांला मदत करीन. मला तुम्ही कसंही करून नवे पाय द्याच."

पप्पूच्या ह्या काकुळतीच्या बोलण्यामुळे बाळकोबा विरघळला आणि त्याने जेव्हा पप्पूच्या पाय नसलेल्या शरीराकडे पाहिले, तेव्हा तर त्याचे डोळे पाण्याने भरून आले. तो काही बोलला नाही. पण त्याने ताबडतोब हत्यारे घेतली आणि एक चांगला लाकडाचा तुकडा घेऊन तो जोराने कामाला लागला.

सुमारे अर्ध्या तासातच बाळकोबाने त्या तुकड्याचे दोन पाय तयार केले. अगदी बारीक आणि चपळ. नंतर बाळकोबा पप्पूला म्हणाला, "हां, पप्पू, तू आता डोळे मिट पाहू."

पप्पूने डोळे मिटून घेतल्यावर बाळकोबाने ते नवे पाय त्याच्या शरीराला इतक्या बेमालूमपणे जोडून टाकले की, खुद्द पप्पूलाही वाटले की आपले पाय शेगडीत जळालेच नाहीत मुळी!

आपल्याला 'पाय फुटले' हे कळताच पप्पू ज्या टेबलावर बसला होता, त्या टेबलावरून त्याने खाली उडी मारली आणि तो खोलीभर इकडे-तिकडे आनंदाने नाचू लागला.

"हं, आता मला पाय आले बाबा. मी शाळेत जाणार," पप्पू बाळकोबाला म्हणाला.

"किती शहाणा आहेस तू पप्पू!" बाळकोबाने त्याचे कौतुक केले.

"पण बाबा, मला आता शाळेत जायचं म्हणजे चांगले नवे कपडे पाहिजेत आणि माझ्याकडे तर ते मुळीच नाहीत." पप्पूने बाळकोबाकडे तक्रार केली.

बाळकोबा गरीब होता. त्याच्या खिशात एक पैसाही नव्हता. मग त्याने पप्पूला फुलांच्या कागदांची एक शर्ट-तुमान शिवली, झाडाच्या सालीचा बूट केला आणि पावाच्या मऊ तुकड्याची एक टोपी केली.

पप्पूने हे नवे कपडे घातले आणि खोलीतल्या भरलेल्या पाण्याच्या बादलीत पाहिले, तेव्हा त्याला इतका आनंद झाला की त्या डौलात नाचत असताना तो म्हणाला,

"वा! मी तर आता एखाद्या राजपुत्रासारखा दिसतो."

"हो. खरोखरच तू आता एखाद्या राजपुत्रासारखा दिसतोस." बाळकोबा म्हणाला. "पण पप्पू, एक लक्षात ठेव. केवळ चांगले कपडे घातले म्हणजे राजपुत्र होतो असं नाही. राजपुत्र व्हायचं म्हणजे नीट वागायला हवं."

"हो, मी नीट वागेन," पप्पू म्हणाला, "पण बाबा आता मला शाळेत जायचं म्हणजे पाटीपुस्तक हवं."

"हो खरंच, की माझ्या लक्षातच हे आलं नाही." बाळकोबा म्हणाला, "पण पप्पू, मी पाटी-पुस्तक कुठून आणू?"

"हात्तिच्या, त्यात काय? दुकानातून आणा पाटी-पुस्तक." पप्पूने सुचविले.

"पण पाटी-पुस्तक आणायला पैसे?" बाळकोबाने विचारले. "माझ्याकडे तर एक पैसाही नाही."

पप्पू उदास झाला. तो एकटाच गुपचुपपणे एका कोपऱ्यात जाऊन बसला. पप्पू कष्टी झालेला बाळकोबाला पाहावेना. तो तत्काळ उठला आणि आपला जुना, एकुलता एक कोट अंगात घालून बाहेर पडला.

काही वेळाने बाळकोबा घरी परतला, तेव्हा पप्पूकरीता तो पाटी-पुस्तक घेऊन आला होता. पण त्याच्या अंगात कोट मात्र नव्हता. पप्पूच्या हे लक्षात आले. तेव्हा त्याने विचारले, "बाबा, तुमचा कोट कुठे आहे?"

"मी तो विकून टाकला," बाळकोबाने उत्तर दिले, "मला फार उकडत होतं आणि मला त्याची आता जरूरही नव्हती."

पप्पूच्या एकदम सारे लक्षात आले. पाटी-पुस्तक आणण्याकरिता पैसे नव्हते म्हणून बाळकोबाने स्वत:चा कोट विकला होता. हे पाहाताच पप्पूला इतके भरून आले की त्याने आपल्या चिमुकल्या हातांनी पटकन् बाळकोबाच्या गळ्याला मिठी मारली.

## ९

दुसऱ्या दिवशी सकाळी पप्पू लवकर उठला. त्याने तोंड धुतले. आंघोळ केली. आणि पाटी-पुस्तक घेऊन बाळकोबाला शाळेत जातो म्हणून सांगून, तो बाहेर पडला. शाळेच्या रस्त्याने जाताजाताच तो मनाशी म्हणू लागला,

'आज प्रथम मी वाचायला शिकेन. उद्या लिहायला शिकेन. परवा हिशेब शिकेन. आणि मग मी इतका हुशार होईन की मला खूप खूप

पैसा मिळेल. मला पैसा मिळाला की मी बाबांना पहिल्यांदा चांगला कोट शिवीन....अगदी हिऱ्याच्या बटनांचा. मला पाटी-पुस्तक आणायला पैसे नव्हते म्हणून विचाऱ्या बाबांनी स्वतःचा एकुलता एक कोट विकला आणि त्या पैशांनी मला पाटी-पुस्तक आणून दिलं. किती चांगले आहेत माझे बाबा!'


आणि अशा रीतीने स्वतःशीच बोलत बोलत तो शाळेत पोचलाही असता, पण तेवढ्यात त्याच्या कानावर ढोलक्याचा आवाज पडला, 'ढुम ढुम ढुमाक्, ढुम ढुम ढुमाक्....' पप्पू थांबला आणि ढोलके कोठे वाजत आहे ह्याचा कानोसा घेऊ लागला. थोड्याच वेळात त्याच्या लक्षात आले की त्याच्या शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याला मधोमध जी एक गल्ली आडवी जाते त्या गल्लीच्या टोकाकडून ढोलक्याचा आवाज येत होता.

'पण आत्ता ह्या वेळेला ढोलकं कशाला वाजतंय?' पप्पूने स्वतःलाच प्रश्न विचारला. 'मला तर आत्ता शाळेत जायचंय. काय करावं बुवा?'

पप्पू रस्त्यालगतच्या दिव्याच्या खांबाजवळ जाऊन विचार करू लागला, 'शाळेला जायचं की ढोलकं का वाजतंय ते पाहायला पळायचं?'

एव्हाना ढोलक्याचे 'ढुम ढुम ढुमाक्—ढुम ढुम ढुमाक्' जोरात वाजू लागले होते. तेव्हा मग पप्पूने मनाशी ठरविले, 'आता असं करायचं, आजच्या दिवस ढोलकं जिथे वाजतंय तिथे जायचं आणि मग उद्या शाळेला जायचं. अगदी नक्की."


झाले. पप्पू शाळेला जायचे सोडून ढोलक्याचा आवाज ज्या बाजूने येत होता त्या गल्लीत जाऊ लागला. तो धावू लागला. तो जसा जोराने पळू लागला, तसा ढोलक्याचा आवाज जवळ जवळ ऐकू येऊ लागला. शेवटी तो जेव्हा त्या गल्लीच्या अगदी टोकाला असलेल्या मैदानावर आला, तेव्हा त्याला दिसले की तेथेच ढोलके सारखे वाजत होते. 'ढुम ढुम ढुमाक्, ढुम ढुम ढुमाक.'



मी म्हलो, रातकिड्या सांभाळून बोल.



पप्पूने त्या बाहुल्यांच्या खेळाच्या तंबूत प्रवेश केला.



वढं बोलून त्यानं पप्पूला एका खुंटीला बांधून ठेवलं

पप्पूने पाहिले, त्या उघड्या मैदानावर चारी बाजूंनी बंद असलेला एक तंबू होता आणि त्या तंबूत बोलक्या बाहुल्यांचा खेळ होणार होता. ढोलक्याचे सतत चालू असलेले 'ढुम ढुम ढुमाक' त्या बाहुल्यांच्या खेळाचीच जाहिरात करीत होते.

पप्पू तंबूबाहेर उभ्या असलेल्या लोकांच्या गर्दीत मिसळला आणि तिकीट-ऑफिसच्या खिडकीजवळ आला. खिडकीवर एक पाटी लटकव-लेली होती. तीवर लिहिले होते, 'तिकीट दोन आणे.'

लोक त्या तिकीट-ऑफिसजवळ जाऊन भराभर तिकीटे विकत घेत होते. कारण आता अगदी थोड्याच वेळात बाहुल्याच्या खेळास सुरुवात होणार होती.

पप्पूला काय करावे ते कळेना. त्याच्या खिशात पैसे तर नव्हते तिकीट घ्यायला आणि त्याला बाहुल्याचा खेळ पाहायची तर अनिवार इच्छा झाली होती. त्याने चंचल नजरेने इकडेतिकडे पाहिले, तेव्हा त्याच्याच शेजारी एक मुलगा उभा असलेला त्याला दिसला. तो मुलगाही तिकिटाच्या खिडकीकडे पाहात होता.

पप्पूने लगोलग त्याला विचारले, "ए मुला, मला दोन आणे उसने देतोस का? फक्त आजच्यापुरते. उद्या मी तुला परत देईन ते."

"दिले असते रे मी तुला," तो मुलगा हसत म्हणाला, "पण त्याच्या बदली तू मला काय देणार?"

"काय देऊ? बोल!" पप्पूने अधीरतेने विचारले. बाहुल्यांचा खेळ पाहायला तो अगदी उतावळा झाला होता. "सांग, लवकर सांग. काय देऊ तुला, ही माझी टोपी? हा शर्ट?"

"छे छे! मला नको तुझी शर्ट-टोपी." तो मुलगा म्हणाला, "मला तुझी ही पाटी दे."

"पाटी?" पप्पू क्षणभर विचारात पडला. पण लगेच तो म्हणाला,

उंच होता आणि दिसायला इतका कुरूप होता की त्याच्याकडे पाहाता-नाही भीती वाटे. त्याची दाढी काळ्या शाईने माखल्यासारखी दिसत होती. ती इतकी लांब होती की जमिनीपर्यंत पोचली होती आणि तिच्यावर पाय देऊनच तो चालत होता. त्याचे तोंड तव्यासारखे मोटे होते. डोळे लाल कंदिलासारखे होते. साप आणि कोल्ह्याच्या शेपटी-पासून तयार केलेला चाबूक त्याने आपल्या हातात घेतला होता.

बाहुल्यांच्या खेळाच्या ह्या मालकाचे नाव होते कर्कशराव. साऱ्या बाहुल्या कर्कशरावाला थरथर कापत. त्यामुळेच आपल्या मालकाला तेथे अचानक आलेला पाहाताच साऱ्या बाहुल्यांची धाबी दणाणली. त्या साऱ्या पप्पूपासून दूर झाल्या आणि एका बाजूला जाऊन उभ्या राहिल्या. कर्कशरावाने आपल्या हातातला चाबूक कडकडावला आणि तो पप्पूच्या जवळ येत म्हणाला, “काय रे, तू इथे आमचा खेळ बंद पाडायला का आलास?”

मालक, हा माझा दोप नाही,” पप्पू गयावया करू लागला.

“चूप बैस. आज रात्री तुला बरोबर करतो,” कर्कशराव कडाडला आणि त्याने बाकीच्या साऱ्या बाहुल्यांना आज्ञा केली, “चला, जा, खेळ पुन्हा चालू करा.” आणि एवढे बोलून त्याने पप्पूला एका खुंटीला बांधून ठेवले.

त्या दिवशी खेळ संपल्यावर कर्कशराव स्वयंपाकघरात गेला. तेथे त्याचे अफाट जेवण तयार होत होते. कर्कशरावाने जेव्हा पाहिले की चुलीखालचा विस्तव मंदावला आहे, तेव्हा त्याने देवजीला हाक मारली आणि म्हटले, “देवजी, खुंटीवरच्या त्या बाहुल्याला घेऊन ये.”

प्रथम देवजी काकू करू लागला. पण जेव्हा कर्कशरावाने डोळे वटारले, तेव्हा देवजीने त्याची आज्ञा पाळली. त्याने पप्पूला कर्कशरावा-समोर उभे केले. पप्पू सारखा ओरडत होता, “बाबा, मला वाचवा. बाबा, मला वाचवा.”

## ११

बाहुल्यांच्या खेळाचा मालक कर्कशराव हा अगदी एखाद्या राक्षसासारखा दिसे. पण तो काही मनाचा तसा वाईट नव्हता. त्याने पप्पूला कळवळून रडताना पाहिले, तेव्हा त्याच्याही हृदयाला पाझर फुटला. त्याने पप्पूला विचारले, "बाळ पप्पू, तुझ्या वडलांचं नाव काय?"

"माझ्या वडलाचं नाव बाळकोबा." पप्पूने उत्तर दिले.

"काय करतात ते?" कर्कशरावाने विचारले.

"त्यांना नोकरी नाही." पप्पू म्हणाला.

"पैसेबिसे बरेच आहेत वाटतं?" कर्कशरावाने विचारले.

"छे छे! त्यांच्याजवळ एक पैसासुद्धा नाही." पप्पू म्हणाला, "मालक, मला पाटी विकत आणून देण्याकरता त्यांनी स्वतःचा एकुलता एक कोट विकला."

"अरेरे, फार वाईट!" कर्कशराव उद्गारला. नंतर त्याने आपल्या खिशातून पाच रुपये काढले आणि ते पप्पूला देत तो म्हणाला, "पप्पू, हे पाच रुपये घे आणि तुझ्या वडलांना दे. जा आता तू घरी."

पप्पूने पाच रुपये घेतले आणि त्या कंपनीतल्या साऱ्या बाहुल्यांचा निरोप घेऊन तो मोठ्या आनंदाने घरी जायला निघाला.

पप्पू आपल्या खिशातले पाच रुपये खुळखुळवीत काही अंतर गेला असेल-नसेल, तो त्याला वाटेत एक कोल्हा आणि एक मांजरी दिसली. कोल्हा लंगडत होता आणि मांजरीचे दोन्ही डोळे मिटलेले दिसत होते. ती दोघे एकमेकांच्या आधाराने रस्त्यातून चालली होती. लंगडा पण डोळस कोल्हा, आंधळ्या पण धडधाकट मांजरीवर आपला भार टाकून, तिला वाट दाखवीत होता.

पप्पूला पाहाताच कोल्हा म्हणाला, "रामराम, पप्पू."

"रामराम!" पप्पूने अभिवादन केले. "पण कोल्हेदादा, माझं नाव तुम्हांला कसं माहीत?"

"वा वा! हे काय सांगायला पाहिजे?" कोल्हा हसत हसत म्हणाला, "अरे पप्पू, तुझ्या वडलांची आणि माझी चांगली दोस्ती. आत्ताच मला ते भेटले होते."

"कुठे भेटले होते माझे बाबा तुम्हांला?" पप्पूने अधीरतेने विचारले.

"तुझ्या घरी, पप्पू." कोल्ह्याने उत्तर दिले, "दारातच उभे होते ते."

"दारात उभे होते?" पप्पूने कुतूहलाने चौकशी केली, "काय करीत होते दारात उभे राहून?"

"थंडीत कुडकुडत होते."

पप्पूला फार वाईट वाटले. तो म्हणाला, "बाबा, आता मुळीच घाबरू नका. आता ह्यापुढे तुम्हांला असं थंडीत कुडकुडत राहावं लागणार नाही. माझ्याकडे पैसे आहेत."

कोल्ह्याने पप्पूचे बोलणे ऐकले. त्याने पटकन् विचारले, "काय पप्पू, पैसेबिसे मिळालेत वाटतं? बाबांना थंडीत कुडकुडावं लागणार नाही म्हणतोस ते?"

"होय, मला पैसे मिळाले आहेत. मी आता श्रीमंत झालो आहे."

पप्पूने छाती फुगवीत सांगितले.

"तू? आणि श्रीमंत झालायस?" कोल्हा उद्गारला आणि तो पप्पूकडे पाहात फजितीच्या सुरात हसू लागला. मांजरीसुद्धा त्याला साथ देऊ लागली.

"का? हसायला काय झालं?" पप्पूने रागाने विचारले. "कोल्होबा, तुम्हांला काय वाटलं, मी तुम्हांला फसवतोय्? हे पाहा, हे पाहा माझे पैसे."

आणि असे म्हणत पप्पूने आपल्या खिशातून पाच रुपये काढले आणि त्या कोल्ह्याला व मांजरीला दाखवले. चांदीचे ते पाच चमकदार रुपये पाहून कोल्ह्याने आपला लंगडा दिसणारा पाय हळूच हलवला आणि मांजरीनेसुद्धा आतापर्यंत मिटलेले आपले डोळे लगेच उघडले. तथापि तिने आपले डोळे पटकन मिटले, कारण तिला भीती वाटली, आपले बिंग बाहेर फुटेल. आपण आंधळ्या नाही हे पप्पूला समजेल. पण तसे काही झाले नाही. कोल्हा लंगडा नसून चांगला धडधाकट आहे आणि मांजरी आंधळी नसून चांगलीच डोळस आहे, हे काही पप्पूच्या लक्षात आले नाही.

पप्पूकडे पाच रुपये आहेत हे पाहाताच कोल्हा त्याला अगदी गोड आवाजात म्हणाला, "पप्पू, तू दमला असशील. चल, जरा माझ्या घरी चल. त्या झाडाखाली मी राहातो. थोडा वेळ बैस आणि मग जा आपल्या घरी. चल, चल."

बिचारा पप्पू त्या कावेबाज कोल्ह्याच्या बोलण्याला भुलला आणि त्या मांजरीबरोबर कोल्होबाच्या घरी गेला.

# १२

कोल्होबाने आणि मांजरीने पप्पूला आपल्या झाडाखालच्या घरी आणले. त्याची चांगली ऊठ-बस केली आणि मग मोठ्या गोड आवाजात कोल्हा पप्पूला म्हणाला, "पप्पू' तुझ्याकडे पाच रुपये आहेत म्हणतोस तू. पण त्याचं तू करणार आहेस तरी काय?"

पप्पूने कोल्होबाकडे अभिमानाने पाहिले आणि म्हटले, "कोल्होबा, पहिल्यांदा मी माझ्या बाबांना एक नवा कोट शिवणार. सोन्या-चांदीचा कोट आणि त्याला हिऱ्या-मोत्यांची बटणं. मग मी पाटी घेईन."


"पाटी?" कोल्होबाने आश्चर्याने विचारले.

"हो," पप्पूने उत्तर दिले, "मी पाटी घेणार कोल्होबा. मी शाळेत जाणार आणि खूप अभ्यास करणार."

"काय वेडा आहेस रे तू पप्पू!" कोल्होबा म्हणाला, "कसला शाळेत जातोस आता तू! वेड्या, मी बघ शाळेच्या मागे लागलो आणि माझा पाय गमावून बसलो."

"आणि मी...." मांजरीने मध्येच तोंड घातले. "मीसुद्धा अभ्या-

जवळच्याच कुंपणावर बसलेला एक काळा पक्षी गाणे गायला. त्याचा अर्थ असा होता. “वाईट लोकांच्या बोलण्याकडे शहाण्याने कधीच लक्ष देऊ नये. कारण, दुष्ट लोकांच्या नादी लागले तर पश्चात्ताप पावायची पाळी येते.”



म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
बाल ... विभाग.
वा. क्र. २२६३ दिनांक २२।७०
विषय बा.वा. क्र. ........

## १२

कोल्होबाने आणि मांजरीने पप्पूला आपल्या झाडाखालच्या घरी आणले. त्याची चांगली ऊठ-बस केली आणि मग मोठ्या गोड आवाजात कोल्हा पप्पूला म्हणाला, "पप्पू‘ तुझ्याकडे पाच रुपये आहेत म्हणतोस तू. पण त्याचं तू करणार आहेस तरी काय ?"

पप्पूने कोल्होबाकडे अभिमानाने पाहिले आणि म्हटले, "कोल्होबा, पहिल्यांदा मी माझ्या बाबांना एक नवा कोट शिवणार. सोन्या-चांदीचा कोट आणि त्याला हिऱ्या-मोत्यांची बटणं. मग मी पाटी घेईन."

"पाटी ?" कोल्होबाने आश्चर्याने विचारले.

"हो," पप्पूने उत्तर दिले, "मी पाटी घेणार कोल्होबा. मी शाळेत जाणार आणि खूप अभ्यास करणार."

"काय वेडा आहेस रे तू पप्पू !" कोल्होबा म्हणाला, "कसला शाळेत जातोस आता तू ! वेड्या, मी बघ शाळेच्या मागे लागलो आणि माझा पाय गमावून बसलो."

"आणि मी...." मांजरीने मध्येच तोंड घातले. "मीसुद्धा अभ्या-

जवळच्याच कुंपणावर बसलेला एक काळा पक्षी गाणे गायला. त्याचा अर्थ असा होता. "वाईट लोकांच्या बोलण्याकडे शहाण्याने कधीच लक्ष देऊ नये. कारण, दुष्ट लोकांच्या नादी लागले तर पश्चात्ताप पावायची पाळी येते."




म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. 22263 दिनांक 22/7/
विषय बा:वा. क्र.

卐 मांजरी फक्त दोन शेर दूध प्यायली.

卐 कोल्होबाने तीनचार कोंबडीची पिल्ले खाल्ली.

卐 पप्पूने मात्र पावाचा एक तुकडा खाल्ला.



साच्या मागे लागले आणि डोळे गप्तावून बसले."

आणि नेमका ह्याच वेळी, जवळच्याच कुंपणावर वसलेला एक काळा पक्षी आपले नेहमीचेच गाणे गायला. त्याचा अर्थ असा होता :

'वाईट लोकांच्या बोलण्याकडे शहाण्याने कधीच लक्ष देऊ नये. कारण, दुष्ट लोकांच्या नादी लागले तर पश्चात्ताप पावायची पाळी येते.'

विचारा पक्षी एवढे बोलला नसता तर? कारण त्या पक्ष्याचे गाणे संपते-न संपते तोच मांजरीने त्याच्यावर झडप घातली आणि त्याला मटकावले. मांजरीने मग आपले तोंड पुसले आणि डोळे मिटून घेऊन ती आंधळी झाली.

पप्पू हे सारे पाहात होता. त्याने मांजरीला विचारले, "काय ग, तू अशा दुष्टपणे त्या पाखराशी का वागलीस?"

"मी त्याला चांगलाच धडा शिकवला!" मांजरी म्हणाली. तिने पुन्हा एकदा आपल्या तोंडावरून हात फिरवला आणि ती पुढे म्हणाली, "दुसरी माणसं बोलत असताना आपण मध्ये लुडबुड करू नये!"

काही वेळाने पप्पू घरी जायला निघाला. तेव्हा तो कोल्होबा आणि ती मांजरी दोघेही त्याच्याबरोबर निघाली.

काही अंतर चालून गेल्यावर कोल्होबा पप्पूला म्हणाला, "काय रे पप्पू, तुला तुझ्याजवळचे पैसे दुप्पट करून पाहिजेत का?"

"हो, हो." पप्पूने सांगितले. "पण पैसे दुप्पट व्हायचे कसे?"

"ते तर अगदी सोपं आहे." कोल्होबाने उत्तर दिले. "पण त्याकरता तुला आमच्याबरोबर जंगलात यावं लागेल."

"जंगलात?" पप्पूने आश्चर्याने विचारले आणि मग अं सारखे करून तो म्हणाला, "नाही रे बुवा, मी नाही येत मला घरी जायचं आहे. बाबांना भेटायचं आहे. मा असतील ते. मी घरी परतलो नाही म्हणून घाब

आपला घरीच जातो."

"बघ बुवा, विचार कर." कोल्होबाने पप्पूला सुचवले. "आमचं काहीच नुकसान नाही त्यात. अरे वेड्या, एका रुपयाचे एका दिवसात शंभर रुपये होतात."

"हो, हो! शंभर होतात, शंभर." मांजरीने कोल्होबाचीच री ओढली.

"पण एका रुपयाचे शंभर रुपये होणारच कसे?" पप्पूने शंका प्रदर्शित केली.

"मी सांगतो कसं ते." कोल्होबाने सुरुवात केली. "जंगलात जायचं. तिथे एका विशिष्ट जागी खड्डा खणायचा. त्यात एक रुपया ठेवायचा. मग तो खड्डा बुजवायचा. त्याला दोन बादल्या पाणी आणि चिमूटभर मीठ घालायचं. दुसऱ्या दिवशी तुला तिथे त्या रुपयाचं झाड उगवलेलं दिसेल."


पप्पूला मोठे आश्चर्य वाटले. त्याने कुतूहलाने विचारले, "कोल्होबा, समज, मी पाच रुपये त्या खड्डयात ठेवले, तर मला किती रुपये मिळतील?"

"हात्तिच्या, अगदी सोपा हिशेब." कोल्होबा म्हणाला. "अरे पप्पू, एका रुपयाचे शंभर रुपये, मग पाच रुपयांचे किती? पाचशे. पाचशे रुपये मिळतील तुला दुसऱ्या दिवशी."

"पाचशे?" पप्पूने आश्चर्याने विचारले. "तर मग मी असंच करणार. मी पाची रुपये त्या खड्डयात टाकणार आणि मग मला त्याचे पाचशे रुपये मिळाले, की त्यांतले अर्धे मी तुम्हांला देईन कोल्होबा."

"छे, छे, आम्हांला तुझ्या पैशांतला एक पैसासुद्धा नको."

ो. हो, अगदी एक पैसासुद्धा नको आम्हांला." मांजरीही



ले आहेत हे लोक!' पप्पू मनाशी म्हणाला, 'मी त्यांना

ले तरी ते घेत नाहीत!'

म्हणाला, "हं, मग चल पप्पू आमच्याबरोबर.

आपला घरीच जातो.”

“बघ बुवा, विचार कर.” कोल्होबाने पप्पूला सुचवले. “आमचं काहीच नुकसान नाही त्यात. अरे वेड्या, एका रुपयाचे एका दिवसात शंभर रुपये होतात.”

“हो, हो! शंभर होतात, शंभर.” मांजरीने कोल्होबाचीच री ओढली.

“पण एका रुपयाचे शंभर रुपये होणारच कसे?” पप्पूने शंका प्रदर्शित केली.

“मी सांगतो कसं ते.” कोल्होबाने सुरुवात केली. “जंगलात जायचं. तिथे एका विशिष्ट जागी खड्डा खणायचा. त्यात एक रुपया ठेवायचा. मग तो खड्डा बुजवायचा. त्याला दोन बालद्या पाणी आणि चिमूटभर मीठ घालायचं. दुसऱ्या दिवशी तुला तिथे त्या रुपयाचं झाड उगवलेलं दिसेल.”

पप्पूला मोठे आश्चर्य वाटले. त्याने कुतूहलाने विचारले, “कोल्होबा, समज, मी पाच रुपये त्या खड्ड्यात ठेवले, तर मला किती रुपये मिळतील?”

“हात्तिच्या, अगदी सोपा हिशेब.” कोल्होबा म्हणाला. “अरे पप्पू, एका रुपयाचे शंभर रुपये, मग पाच रुपयांचे किती? पाचशे. पाचशे रुपये मिळतील तुला दुसऱ्या दिवशी.”

“पाचशे?” पप्पूने आश्चर्याने विचारले. “तर मग मी असंच करणार. मी पाची रुपये त्या खड्ड्यात टाकणार आणि मग मला त्याचे पाचशे रुपये मिळाले, की त्यांतले अर्धे मी तुम्हांला देईन कोल्होबा.”

“छे, छे, आम्हांला तुझ्या पैशांतला एक पैसासुद्धा नको.”

“...ो, हो, अगदी एक पैसासुद्धा नको आम्हांला.” मांजरीही

...ाले आहेत हे लोक!’ पप्पू मनाशी म्हणाला, ‘मी त्यांना ...ले तरी ते घेत नाहीत!’

...णाला, “हं, मग चल पप्पू आमच्याबरोबर.

उद्या सकाळी तुला पाच रुपयांचे पाचशे रुपये मिळतील."

आणि मग पप्पू कोल्होबाबरोबर आणि त्या मांजरीबरोबर जाऊ लागला. आता पप्पू आपल्या वडिलांना विसरला, स्वतःला पाटी घ्यायला विसरला आणि आपले सारे निश्चयही विसरला. तो कोल्होबाला म्हणाला, "हं. चला कोल्होबा, उचला पाय झपझप."

आणि मग ती तिघेही जंगलाकडे जाऊ लागली.

## १३

पप्पू, कोल्होबा आणि मांजरी [illegible]-कडे निघाली. ती तिघेही संध्याकाळी, अगदी थकून जाऊन, एका खाणावळीजवळ आली.

"आपण इथे थोडा वेळ थांबू या." कोल्होबा म्हणाला, "थोडंसं खाऊ आणि जराशी विश्रांती घेऊ. मध्यरात्री आपल्याला निघायला हवं, म्हणजे पहाटेला आपण त्या जागी नक्की पोचू."

म्हणून ती तिघेही त्या खाणावळीत शिरली आणि आतल्या एका बाकावर बसली. पण त्या तिघांपैकी एकालाही भूक नव्हती. त्यामुळे मांजरी फक्त दोन शेर दूध प्यायली. कोल्होबाने फक्त तीनचार कोंबडीची पिल्ले खाल्ली. पप्पूने मात्र पावाचा एक तुकडा खाल्ला.

एवढे झाल्यावर कोल्होबा खाणावळवाल्याला म्हणाला, "हे पाहा मालक, आम्हांला ही रात्र इथेच काढायची आहे. आम्हांला दोन चांगल्या खोल्या पाहिजेत. एक पप्पूरावांना आणि दुसरी आम्हा दोघांना. पण मध्यरात्री आम्हांला उठवायचं बरं का. एका महत्त्वाच्या कामाला जायचं आहे आम्हांला."

खाणावळवाल्याने कोल्होबाच्या म्हणण्याप्रमाणे सारी व्यवस्था केली. पप्पू आपल्या खोलीत बिछान्यावर पडल्यावर त्याला गाढ झोप लागली आणि त्याला स्वप्न पडले: आपण एका शेतात उभे आहोत आणि आजूबाजूला रुपयांनी वाकलेली झाडे आहेत. जणू ही सारी रुपयांची झाडे म्हणत होती, "ज्याला कुणाला हवं त्याने यावं आणि आम्हांला तोडून न्यावं."

पप्पू त्या झाडावरचे रुपये तोडायला सुरुवात करणार इतक्यात त्याच्या खोलीच्या दारावर कोणीतरी धक्के मारीत असल्याचा आवाज झाला आणि पप्पूचे स्वप्न भंगले. तो खडबडून जागा झाला. त्याने दार उघडले. ठरल्याप्रमाणे खाणावळवाला सांगायला आला होता, "मध्यरात्र झाली. उठा."

"कोल्होबा आणि मांजरीबाई तयार आहेत का?" पप्पूने डोळे पुशीत विचारले.

"तयार?" खाणावळवाल्याच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडला. "अहो, ते तर दोन तासांपूर्वीच निघून गेले."

"गेले? कुठे?" पप्पूने घाबरून विचारले.

"घरी जातो म्हणाले." खाणावळवाल्याने सांगितले, "मांजरीबाईंना निरोप आला, की त्यांचा मुलगा एकाएकी जास्त आजारी झाला आहे. त्यामुळे कोल्होबाही त्यांच्याबरोबर निघून गेले."

"पण जाताना पैसे तरी देऊन गेले का?" पप्पूने विचारले.

"नाही. तुम्ही बरोबर असताना ते पैसे कसे देणार? त्यांनी तर

मला तुमच्याकडून पैसे घ्यायला सांगितलं." खाणावळवाला म्हणाला.

" त्यांनी आणखी काही तुम्हांला सांगितलं का? पप्पूने रागाने विचारले.

"हो." खाणावळवाला म्हणाला, "ते उद्या सकाळी तुम्हांला, सांगितलेल्या जागी भेटणार आहेत."

पप्पूने निमूटपणे खाणावळवाल्याला झालेले पैसे दिले आणि तो बाहेर पडला.

पप्पू अडखळत रस्त्याने जाऊ लागला. काळोख तर मी म्हणत होता. अगदी स्वतःचा हातही दिसत नव्हता. पप्पू तसाच पुढे चालला होता.

काही वेळ असेच चालल्यावर थोडासा थकवा आल्यामुळे पप्पू एका झाडाला टेकून उभा राहिला. तेवढ्यात त्याच्या कानावर काही शब्द पडल्याचा भास झाला.

"कोण आहे?" पप्पूने धीर करून विचारले.

"मी. तू मारलेल्या त्या रातकिड्याचा भाऊ." अंधारातून आवाज आला.

"मग तुला आता काय हवंय?" पप्पूने विचारले.

"पप्पू, माझं ऐक." पुन्हा आवाज आला. "पुढे जाऊ नकोस. पुढचा रस्ता फार धोक्याचा आहे."

"मी पुढे जाणार." पप्पूने निर्धाराने उत्तर दिले.

"पण माझं ऐक!" पुन्हा तोच आवाज पप्पूच्या कानी पडला. "जी मुलं स्वतःला हवं तसं वागतात, त्यांचं फार नुकसान होतं!"

"हो, हो. मी बऱ्याच वेळा ऐकलं आहे हे." पप्पूने प्रत्युत्तर दिले. "मी पुढे जाणार. तू आपल्या वाटेने जा कसा आता."

"बरं, मी जातो पप्पू. देव तुझं चोरांपासून रक्षण करो!" आणि मग रातकिड्याचा आवाज नाहीसा झाला आणि काळोख फारच दाटला. पप्पू मात्र तसाच पुढे चालू लागला.

# १४

पप्पू तसाच पुढे चालला. वाटेने जाता जाता तो स्वतःशीच बोलू लागला, "काय गंमत आहे पाहा. जो उठतो तो आम्हा लहान मुलांनाच दम देतो. आम्हा लहान मुलांनाच उपदेश करतो. हा एवढासा रातकिडाच पाहा ना. मी त्याचं ऐकलं नाही, म्हणून म्हणतो कसा, 'देव तुझं चोरांपासून रक्षण करो!' हुं, म्हणे चोर! कसले चोर आणि कसलं काय! आणि समजा, मला चोर भेटले, तर मी काय घाबरणार आहे की काय त्यांना? गोष्टच सोडा! मी त्यांना अगदी सरळ विचारीन, 'काय रे बाबांनो, काय पाहिजे तुम्हांला? माझ्याकडे काही लटपटपंची चालायची नाही. तुम्ही आपले मुकाट्याने आपल्या वाटेला लागा पाहू.' आणि एवढं मी जर का अगदी निश्चयाने म्हटलं, तर नक्कीच ते चोर पळून जातील. पण समजा, ते नाहीच पळाले तर? तर मग मी स्वतःच पळून जाईन, म्हणजे झालं!"

पप्पू असा आपल्याशीच विचार करीत चालला असताना त्याला आपल्या पाठीमागे कोणीतरी धावत येत असल्याचा भास झाला. म्हणून त्याने वळून पाहिले, तेव्हा थोड्याच अंतरावर त्याला दोन व्यक्ती त्याच्या दिशेने धावत येताना दिसल्या. त्या दोघाही व्यक्तींनी अगदी डोक्या-

पासून पायांपर्यंत काळे कपडे घातले होते. त्यांना पाहाताच आपण मुळीच घाबरलो नाही असे भासवून पप्पू जोराने चालू लागला. पण तितक्यातच ते दोघे पप्पूच्या अगदी जवळ येऊन पोचले. एक जाडा चोर आणि दुसरा वाळका चोर. पप्पू मनात चांगलाच चपापला. "अरे बापरे! खरंच आले की चोर!" तो पुटपुटला आणि त्याने चटकन् आपल्या खिशातल्या पैशांना हात घातला. पण मग पैसे कोठे ठेवावे हे न सुचल्यामुळे पप्पूने ते तोंडात ठेवले आणि तो पळू लागला. तथापि तो त्या दोघा चोरांपासून फारसा दूर जाऊ शकला नाही. कारण तेवढ्यातच जाड्या चोराने पप्पूचा हात पकडला आणि दरडावले,

"हं, चल काढ तुझ्याकडे काय आहे ते लवकर!"

पप्पूला काही बोलता येईना. कारण त्याने तोंडातच पैसे ठेवले होते. तेव्हा त्याने त्या चोरांना अगदी वाकून नमस्कार केला आणि आपल्या हावभावांनी सांगितले, की मी एक कळसूत्री बाहुला आहे आणि माझ्या-कडे मुळीच पैसे नाहीत. पण त्या चोरांना ते पटले नाही. तेव्हा वाळका चोर पप्पूच्या अंगावर ओरडला,

"बंद कर तुझे हे चाळे! पैसे काढ पहिल्यांदा!"

पप्पूने पुन्हा खुणा करून सांगितले, की माझ्याकडे अगदी पैसे नाहीत.

"आता बऱ्या बोलाने पैसे देतोस, की गळा दाबू तुझा?" जाडा चोर म्हणाला.

"हो, प्राण घेऊ तुझा?" वाळका चोर म्हणाला, "हं, चल, काढ पैसे!"

ुन्हा

"नुसता तुझाच प्राण घेऊन थांबणार नाही," जाड्या धमकावले, "तुझ्या बाबांनाही गळा दाबून मारू!" दिसले, ती

"हो हो, तुझ्या बाबांनासुद्धा मारू!" वाळक्या

जोडली. "नको! नको! माझ्या बाबांना नका हो ाली.

# १५

पप्पूने पोहत पोहत ती नदी पार केली आणि तो किनाऱ्याला आला. त्याने पाहिले, आजूबाजूला फक्त जंगल होते आणि आत काही अंतरावर एक फिक्कट निळ्या रंगाचे घर होते. तेव्हा मग पप्पू त्या घराच्या दिशेने चालू लागला.

पप्पू त्या बंगल्याजवळ पोचला आणि त्याने दरवाजावर टक् टक् केले. पण दरवाजा उघडला जायच्या अगोदरच पप्पूला अतिश्रमाने घेरी आली आणि तो तेथेच पडला.

काही वेळाने पप्पूने डोळे उघडले, तेव्हा त्याने पाहिले, आपण एका पलंगावर निजलो आहो आणि आपल्या उशालाच एक अत्यंत देखणी मुलगी बसली आहे. ती परी होती. पलंगाच्या एका बाजूला एक डॉक्टर पप्पूला तपाशीत होते. पप्पूला चांगलाच ताप भरला होता.

डॉक्टर तपाशीत असतानाच पप्पूला ग्लानी आली आणि तो पुन्हा बेशुद्ध झाला.

काही वेळाने तो पुन्हा शुद्धीवर आला, तेव्हा त्याला दिसले, ती दयाळू परी त्याला औषध घेण्यासाठी उठवीत होती.

"हं, हे औषध घे वरं बाळ." ती परी ममतेने म्हणाली.

काकुळतीच्या स्वरात म्हणाला आणि तो असे बोलत असतानाच त्याच्या तोंडातील रुपयांचा आवाज झाला.

"आँ! तोंडात पैसे ठेवले आहेस वाटतं?" जाड्या चोराने विचारले, "चल, काढ ते पैसे बाहेर!"

पण पप्पू गप्पच राहिला.

"बहिरा आहेस वाटतं?" वाळक्याने दरडावले. "थांब, असा नाही तू ऐकायचास! तुझं तोंड बळजबरीनेच उघडायला हवं!"

असे म्हणून त्या दोघा चोरांनी मिळून पप्पूला पकडले. मग वाळका चोर दोन्ही हातांनी पप्पूचे तोंड उघडू लागला. पण पप्पू दाद देईना. त्या चोराने खूप प्रयत्न केला, तेव्हा मग पप्पूने आपले तोंड उघडल्यासारखे केले आणि त्या वाळक्या चोराच्या बोटांचा इतक्या जोराने चावा घेतला, की त्या चोराची बोटेच तुटून पप्पूच्या तोंडात आली. पप्पूने ती हातात घेऊन पाहिली तो ती मांजरीच्या पंजासारखी दिसली.

वाळका चोर "ओय ओय" करीत बाजूला झाला आणि जाडा चोर त्याच्या समाचाराला गेला. त्या दोघांचे आपल्याकडे लक्ष नाहीसे पाहून पप्पूने धूम ठोकली.

पप्पू पळाल्याचे त्या दोघा चोरांच्या लक्षात येताच तेही त्याच्या मागोमाग धावू लागले. पप्पू पुढे आणि ते चोर मागे.

अशी जवळ जवळ मैलभर शर्यत चालली. धावताधावता पप्पू एका नदीकाठी आला. त्याला काय करावे हे कळेना. त्याने मागे वळून पाहिले, ते दोघे चोर वाऱ्याच्या वेगाने येत होते. तेव्हा मागचापुढचा [illegible]चार न करता एक-दोन-तीन म्हणून पप्पूने धाडकन त्या नदीत उडी [illegible] आणि तो सरसर पाणी कापू लागला. अशा तऱ्हेने जवळजवळ [illegible]पार केल्यानंतर पप्पूने मागे वळून पाहिले, तेव्हा त्याला [illegible]न चोर उभे असलेले दिसले. त्याच्याकडे मुठी दाखवून ते [illegible]ळ्याने बडबडत होते.

पप्पूने तोंड वेडेवाकडे केले आणि विचारले, "हे औषध गोड आहे की कडू?"

"जरासं कडू आहे. पण बरं वाटेल तुला त्याने." ती परी म्हणाली.

"अंहं! मी नाही घेणार कडू औषध!" पप्पूने मुसमुसायला सुरुवात केली.

"हे बघ बाळ, ऐक माझं," ती परी पप्पूला समजावू लागली.

"मला नको कडू औषध!" पप्पूने तिला झिडकारले.

"चल घे पटकन्. मी तुला खडीसाखर देते त्यावर." परीने पप्पूला लालूच दाखवली.

"कुठाय साखर?" पप्पूने विचारले. "पहिल्यांदा मला साखर हवी. मग मी औषध घेईन."

"नक्की?"

"अगदी नक्की." पप्पूने उत्तर दिले.

परीने त्याला साखरेचा एक खडा दिला. पप्पूने तो हातावर घेतला आणि पटकन् तोंडात टाकला. मग मिटक्या मारीत तो म्हणाला, "सारी औषधं साखरेचीच केलेली असती तर किती बरं झालं असतं! मी तर मग रोज औषध प्यायलो असतो."

पुन्हा एकदा त्या दयाळू परीने पप्पूला विनविले, "हं, चल आटप, आता घे बरं ते औषध."

पप्पूने औषधाचा ग्लास उचलला. नाकाशी नेऊन त्याचा वास घेतला. तोंडाशी नेला आणि पुन्हा नाकाजवळ नेत तो म्हणाला, "अंहं. औषध फार कडू आहे."

"अरे, पण तू अजून औषध घेतलंही नाहीस, तर तुला ते कडू कसं लागलं?" परीने विचारले.

"अं-अं-अं, औषध कडू आहे. मी नाही पिणार." पप्पू रडत रडत म्हणाला.

"असं करून कसं चालेल बरं बाळ? तुला घ्यायलाच हवं ते औषध." परी म्हणाली.

"मला आणखी थोडी साखर दे म्हणजे मग मी औषध पिईन." पप्पूने सुचवले.

परीने त्याला आणखी थोडी साखर दिली. पप्पूने ती पटकन मटकावली. औषधाचा ग्लास मात्र त्याने तसाच हातात ठेवला.

पुन्हा एकदा त्या दयाळू परीने पप्पूला विनवले, "हं, चल आटप. आता घे बरं ते औषध पटकन्."

तेव्हा मग कोठे पप्पूने तोंड वेडेवाकडे करीत, आळोखेपिळोखे देत औषध घेतले.

"हं, आता सांग बरं मला सारं, तू इथे कसा आलास ते." परी त्याला पलंगावर नीट झोपवीत म्हणाली.

मग पप्पू त्या परीला आपली हकीकत सांगू लागला :

"आमच्या बाहुल्यांच्या खेळाच्या मालकांनी मला पाच रुपये दिले आणि मी घरी जाऊ लागलो तर मला वाटेत कोल्होबा आणि मांजरीबाई भेटल्या. कोल्होबा मला म्हणाले, 'मी तुला पाच रुपयांचे पाचशे करून देतो.' तेव्हा मी त्याच्याबरोबर जाऊ लागलो. रात्र पडली तेव्हा आम्ही एका खाणावळीत वस्तीला राहिलो आणि मग ठरल्याप्रमाणे खाणावळवाल्याने मला मध्यरात्री उठवलं तेव्हा कोल्होबा आणि मांजरीबाई मी उठायच्या अगोदरच कुठे बेपत्ता झाली होती."

पप्पू थोडा वेळ थांबला आणि त्याने पुढे बोलायला सुरुवात केली :

"मी त्या खाणावळवाल्याला झालेले पैसे दिले आणि तसाच त्या काळोख्या रात्री घरी जायला निघालो. काही अंतर चालून गेल्यावर दोघा चोरांनी मला गाठलं. ते माझ्याकडे पैसे मागू लागले. मी त्यांना पैसे न देता उलट ते मी नीट माझ्या तोंडात ठेवले. तेव्हा त्यापैकी एक चोर माझं तोंड उघडायचा जोराचा प्रयत्न करू लागला, तसा मी त्याच्या हाताचा

कडकडून चावा घेतला. असा, की त्या चोराच्या हाताची बोटंच तुटून माझ्या तोंडात आली. मांजरीच्या पंजासारखी होती ती. चोर 'ओय ओय' करीत दूर जाऊन बसला. माझ्याकडे त्या दोघांचं लक्ष नाही असं पाहून मी पळालो. मी पळालो हे पाहून ते दोघे चोरही माझ्यामागे लागले. पळता पळता वाटेत नदी लागली. मी नदीत पोहून आलो आणि ते दोघे चोर पलीकडच्या काठावरच राहिले. पुढलं सारं तुझ्यासमोरच घडलं."

परीने पप्पूची सारी हकीकत नीट ऐकली. आणि मग विचारले, "वरं, पण तुझे पैसे तर नीट आहेत ना तुझ्याजवळ?"

"पैसे? पैसे कुठेतरी पडले माझे." पप्पू चक्क खोटे बोलला.

आणि पप्पू एवढे बोलतोय-न बोलतोय तो त्याचे नाक आपोआप लांब होऊ लागले. बघता बघता ते हातभर लांब झाले.

परीने विचारले, "हे तुझे पैसे कुठे हरवले?"

"इथेच कुठेतरी पडले." पप्पू पुन्हा खोटे बोलला आणि त्याचे नाकही तत्काळ वाढू लागले.

"ठीक आहे. तुझे पैसे ह्या जंगलात पडले असतील तर तुला परत मिळतील. कारण इथे हरवलेल्या साऱ्या वस्तू नेहमी परत मिळतात." परी म्हणाली.

"नाही, नाही, पैसे हरवले नाहीत माझे." पप्पू गडबडून म्हणाला, "मी ते चुकीने गिळले."

आणि पुन्हा एकदा खोटे बोलल्याबद्दल पप्पूचे नाक इतके लांब झाले होते, की त्याला कोठल्याही बाजूला हलता येईनासे झाले. पप्पू इकडे ह्या बाजूला वळला तर त्याचे लांब नाक पलंगावर आपटले. तो दुसऱ्या बाजूला वळला तर त्याचे अधिकच मोठे झालेले नाक भिंतीवर आपटले. आपली मान वर करायचा त्याने प्रयत्न केला तर ते लांब नाक त्याला उचलवेनासुद्धा.

पप्पूला समजेना, की आपले नाक असे एकाएकी लांब का होऊ लागले? त्याने खालच्या मानेने वर पाहिले तेव्हा त्याला ती परी त्याच्याकडे पाहून हसताना दिसला.

"का हसतेस तू?" पप्पूने तिला विचारले.

"तू खोटं बोलतोयस म्हणून!" परी म्हणाली.

"कशावरून मी खोटं बोललो?" पप्पूने विचारले.

"अरे बाबा, खोटं नेहमी उघडकीला येतं." परी म्हणाली. "आणि म्हणूनच तू खोटं बोलल्याबद्दल तुझं नाक लांब झालं."

पप्पू अगदी खजील झाला. लपण्याचा प्रयत्न करू लागला. पण त्याला कोठें लपावे हे कळेना. तेव्हा तो दरवाजातून बाहेर पळू लागला पण त्याला तसे करता येईना. कारण त्याचे एव्हाना खूपच लांब झालेले नाक दरवाजात आडवे अडकून राहिले.

## १६

पप्पूने दरवाजातून बाहेर जायचा खूप प्रयत्न केला, पण त्याचे नाक काही त्या दरवाजातून बाहेर जाईना, इतके ते मोठे झाले होते. खरे म्हणजे त्या परीनेच खोटे बोलल्याबद्दल पप्पूला

शिक्षा केली होती. पण पप्पू अगदी रडवेला झालेला पाहाताच परीला त्याची दया आली. तेव्हा तिने दोन वेळा टाळी वाजवली. लगेच कितीतरी सुतारपक्षी तेथे आले. परीने त्यांना पप्पूचे नाक दाखवले आणि बघता बघता ते पप्पूच्या नाकावर 'टोक-टोक' करू लागले. थोड्याच वेळात पप्पूचे नाक पूर्वीसारखे झाले.

"किती दयाळू आहेस ग तू!" पप्पू परीला म्हणाला, "खरंच, मला तू किती आवडतेस!"

"मलासुद्धा तू फार आवडतोस!" परी पप्पूला म्हणाली.

"आणि तू इथेच माझ्यावरोबर राहिलास तर मी तुला अगदी माझ्या धाकट्या भावासारखा सांभाळीन."

"पण मग माझ्या बाबांचं काय? ते एकटेच राहातील ना?" पप्पूने शंका प्रदर्शित केली.

"मी त्या साऱ्या गोष्टीचा विचार केला आहे. मी तुझ्या वडलांना कळवलं आहे आणि आज रात्री ते इथे येतीलही." परी म्हणाली.

"खरंच?" पप्पूने आनंदातिशयाने विचारले. "किती बरं होईल माझे बाबा इथे आले तर. मला किती आनंद झालाय म्हणून सांगू तुला. पण परीताई, माझे बाबा इथे येणार आहेत तर मी त्यांना पुढे जाऊन भेटू का? त्यांना कधी बघेन असं मला झालं आहे. मी जाऊ का नदीच्या काठापर्यंत?"

"जा ना." परीने परवानगी दिली. "पण वाट चुकू नकोस. ह्या जंगलातून सरळ गेलास की तुला नदीची वाट दिसेल."

परीचा निरोप घेऊन पप्पू निघाला आणि बंगल्यापासून काही अंतरावर येताच तो एखाद्या मुलासारखा धावू लागला. काही वेळाने पप्पू एका मोठ्या झाडाखाली विश्रांतीकरता थांबला असताना आजूबाजूच्या झाडीतून कोणीतरी बोलल्याचा आवाज त्याला ऐकू आला. तथापि त्याने मागे वळून पाहायच्या अगोदरच दोन व्यक्ती त्याच्यासमोर येऊन उभ्या

राहिल्या. कोण होत्या त्या व्यक्ती, माहीत आहे?—कोल्होबा आणि मांजरीबाई.

"अरे, हा तर आपला पप्पू!" कोल्होबा पप्पूला मिठी मारीत म्हणाला, "अरे पण पप्पू, तू इथे कसा?"

"कोल्होबा, फार मोठी हकीकत आहे ती." पप्पू म्हणाला. "मी ती सारी तुम्हांला नंतर सांगेन. पण त्या रात्री तुम्ही दोघं मला त्या खाणावळीत सोडून घरी गेलात ना, तेव्हा मी परतताना वाटेत मला दोन चोर भेटले."

"चोर? मग काय झालं?" कोल्होबाने आश्चर्याने विचारले.

"त्या चोरांना माझे पैसे चोरायचे होते." पप्पू सांगू लागला. "पण मी त्यांना झुकांडी देऊन पळालो तो नदी ओलांडून इथे आलो."

पप्पू आपली हकीकत त्यांना सांगत असता त्याची नजर मांजरीच्या पुढल्या लंगड्या पायाकडे गेली. त्या पायाला पंजाच नव्हता. पप्पूला मोठे आश्चर्य वाटले. त्याने विचारले, "मांजरीबाई, तुमच्या पायाचा पंजा कुठे गेला?"

मांजरीने त्याला उत्तर द्यायचा प्रयत्न केला, पण ती गोंधळली. तेव्हा कोल्होबा तिच्या मदतीला आला. तो म्हणाला, "मांजरीबाई फार विनयशील आहेत आणि म्हणूनच त्या बोलत नाहीत. मी सांगतो पप्पू तुला काय झालं ते. सुमारे तासाभरापूर्वीच आम्हांला एक लांडगा भेटला होता. त्याला फार भूक लागली होती आणि आमच्याकडे तर खायला काही नव्हतं. तेव्हा मग मांजरीबाईने आपलाच पंजा तोडला आणि त्या लांडग्याला खायला दिला."

आणि मांजरीचे हे सत्कृत्य सांगत असतानाच कोल्होबाच्या डोळ्यांना पाणी आले. ते पुसून त्याने विचारले, "अरे पण पप्पू, तू कसा ह्या वेळी?"

"मी माझ्या वडलांना आणायला चाललोय." पप्पूने उत्तर दिले.

"आणि तुझे ते पाच रुपये?" कोल्होबाने विचारले.

"आहेत ना ते खिशात." पप्पूने सांगितले. "त्यांतला फक्त एकच रुपया खर्च झाला, खाणावळवाल्याला दिला."

"बाकीचे तरी रुपये आहेत ना? ठीक." कोल्होबा म्हणाला, "चल, तेवढे जरी लावलेस तरी तुला चारशे रुपये मिळतील."

"खरंच मिळतील मला चारशे रुपये?" पप्पूने अधीरतेने विचारले.

"खरं म्हणजे काय? नक्कीच!" कोल्होबाने सांगितले.

"कुठे आहे ते शेत?" पप्पूने चौकशी केली.

"ह्या इथेच जवळपास." कोल्होबाने सांगितले.

"मग चला लवकर तिकडे." पप्पू म्हणाला, "मला संध्याकाळच्या आत परत यायला हवं."

आणि मग ती तिघेही—पप्पू, कोल्होबा आणि मांजरी—त्या पैसे देणाऱ्या शेताकडे जायला निघाली. अगदी झपाझप.

बऱ्याच वेळानंतर ती तिघेही एका शेतात आली.

"हेच ते शेत." कोल्होबा म्हणाला, "हे बघ पप्पू, तू आता इथे एक खड्डा खण, अगदी तुझ्या हातांनी आणि मग तुझ्याजवळचे रुपये त्यात टाक."

पप्पूने कोल्होबाची आज्ञा अगदी अक्षरशः पाळली.

"हं! आता आजूबाजूला कुठे विहीर आहे का बघ आणि तिच्यातून थोडं पाणी आण आणि त्या खड्ड्यावर शिंपड." कोल्होबाने पुढे सांगितले.

पप्पूने आजूबाजूला पाहिले, तो जरा दूरच त्याला एक विहीर दिसली. तो धावतच तेथे गेला. पण पाणी कशातून आणायचे? पप्पूला प्रश्न पडला. त्याच्याजवळ तर काही भांडे नव्हते. तेव्हा मग पप्पूने आपल्या पायातला बूट काढला आणि त्यातच पाणी घेऊन तो घाईघाईने परतला.

त्या खड्ड्यावर पप्पूने पाणी ओतले आणि कोल्होबाला विचारले, "कोल्होबा, आता काही करायचं उरलं आहे का?"



"काय रे पोपटा, असा दात का विचकतोस? पप्पूने विचारले.



पप्पूला पाठीवर घेऊन कबूतर आकाशात उंच उंच जाऊ लागले.

"नाही, काही नाही." कोल्होबाने उत्तर दिले आणि तो मांजरीला म्हणाला, "चला, आता आपण जाऊ या. पप्पू, तू आता आणखी अर्ध्या तासाने इथे परत ये. म्हणजे मग तुला ह्या खड्ड्यातून वर आलेलं एक छोटंसं झाड दिसेल. त्यालाच रुपये लागलेले दिसतील तुला."

पप्पूला फार आनंद झाला. त्याने कोल्होबाचे आणि मांजरीचे आभार मानले आणि तो म्हणाला,

"खरंच, तुम्ही दोघं किती दयाळू आहात! मला पैसे मिळाले की मग मी तुम्हांला एक चांगली वस्तू बक्षीस देईन."

"छे, छे, बक्षीस वगैरे आम्ही काही घेणार नाही." कोल्होबा म्हणाला, "फक्त आम्हांला तुला दाखवायचं होतं, की अगदी काहीही काम न करता माणसाला पैसे मिळवता येतात!"

आणि एवढे बोलून कोल्होबाने आणि मांजरीने पप्पूचा निरोप घेतला आणि ती आल्या मार्गाने निघून गेली.

## १७

पप्पूने काही वेळ आजूबाजूला फिरण्यात घालवला आणि साधारणपणे अर्धा तास होऊन गेला असे त्याला वाटले, तेव्हा त्याने ज्या खड्ड्यात आपल्याजवळचे पैसे पुरून ठेवले होते, त्या खड्ड्याजवळ तो जाऊ लागला. पप्पू स्वतःशीच बोलू लागला,

"कोल्होबा म्हणाला, की मला एका रुपयाचे शंभर रुपये मिळतील, पण मी तर त्या खड्ड्यात चार रुपये ठेवले आहेत. म्हणजे मग मला चार रुपयांचे चारशे रुपये मिळायला हवेत. पण समजा, मला तीनशेच रुपये मिळाले तर! नाही, नाही. नाही, तसं नाही. तीनशेच रुपये का? हजार रुपये कशावरून मिळणार नाहीत? हो, आणि मला खरंच हजार रुपये मिळाले तर मग काय मौज होईल! किती किती वस्तू मला घ्यायच्या आहेत. मला पैसे मिळाले, की त्या साऱ्या वस्तू मी घेऊन टाकीन. मग काय मजाच मजा होईल!"

अशा रीतीने मनोराज्ये करीतच पप्पू त्या शेतात आला. पैसे पुरून ठेवलेल्या जागेजवळ तो पोचला. त्याने त्या खड्ड्याकडे अगदी नीट निरखून पाहिले. अगदी डोळे फाडफाडून पाहिले. पण त्याला काही कोठे त्याने पुरलेल्या पैशांचे झाड आलेले दिसले नाही. तो त्या खड्ड्याच्या भोवती गोल गोल फिरू लागला आणि नीट न्याहाळू लागला. पैशांच्या झाडाचे कोठे एखादे लहान पान दिसते का? आणि तो आपल्या ह्या कामात गुंग असतानाच कोणीतरी हसल्याचा आवाज त्याच्या कानी पडला.

पप्पूने वळून पाहिले, तर तेथल्याच एका झाडावर एक म्हातारा पोपट बसलेला त्याला दिसला. तोच हसत होता.

पप्पूने त्याच्याकडे पाहाताच पोपट पुन्हा हसला. पप्पू रागावला. त्याने पोपटाला विचारले, "काय रे पोपटा, असा दात का विचकतोस?"

"दात विचकू नको तर काय करू!" तो म्हातारा पोपट म्हणाला, "एखाद्याला कुणीतरी काहीतरी मूर्खासारखं सांगितलं आणि तो तसा वागू लागला, तर तुला हसू नाही यायचं पप्पू?"

"म्हणजे? माझ्याबद्दल बोलतो आहेस तू?" पप्पूने विचारले.

"होय. मी तुझ्याबद्दलच बोलतो आहे." त्या म्हाताऱ्या पोपटाने उत्तर दिले. "पप्पू, तुला असं कसं वाटतं, की भाजीपाल्याप्रमाणे पैसेही

जमिनीत उगवतील ? मीसुद्धा एकदा अशा वेडगळपणावर विश्वास ठेवला होता आणि त्याची फळं मला मिळाली. पण निदान एक गोष्ट तरी मी शिकलो आणि ती ही, की आपल्या कष्टाने मिळवलेला पैसा कसा नीट राखून ठेवावा. पैसा मिळवण्यापेक्षा आलेला नीट कसा जपून ठेवावा हेच माणसाला समजायला हवं."

"म्हणजे ? तू काय बोलत आहेस तेच मुळी मला समजत नाही." पप्पू गोंधळून म्हणाला.

"मग नीट ऐक तर." पोपटाने पप्पूला बजावले. "त्या खड्डयातून पैशांचं झाड कधीच बाहेर येणार नाही. कारण तू जेव्हा पाणी आणायला म्हणून विहिरीवर गेलास तेव्हाच त्या लबाड कोल्होबाने आणि त्या लुच्च्या मांजरीने त्या खड्डयातले पैसे काढून घेतले. त्या खड्डयात आता पैसे मुळी नाहीतच. आणि भाजीपाल्यासारखे पैसे झाडाला कधीच लागत नाहीत!"

पप्पू आ वासून त्या पोपटाकडे पाहू लागला. त्याचा त्या पोपटाच्या बोलण्यावर विश्वास बसेना. तेव्हा पप्पू स्वतःच त्याने जेथे पैसे पुरून ठेवले होते ती जागा खणू लागला. त्याने अगदी खूप खूप खणले, पण त्याला पैसे काही सापडले नाहीत. त्या म्हाताऱ्या पोपटाचे म्हणणे खरे ठरले होते.

पप्पूला अगदी वेड्यासारखे झाले आणि तो तसाच तेथे बसून राहिला.

२२६३
विषय

१८

पैशाच्या झाडाच्या नादी लागून, आपले चार रुपये गमावलेला उदास, निरुत्साही पप्पू त्या शेतात तसाच एकटा बसून राहिला. तशा त्या अवस्थेत तो आणखीही काही वेळ तेथे बसला असता, पण तितक्यात त्याला आपल्या डोक्यावर एक कबूतर गिरगिरत असताना दिसले. काही वेळाने ते कबूतर खाली उतरले आणि त्याने पप्पूला विचारले, "बाळ, तू इथे काय करीत आहेस?"

"दिसत नाही का तुला मी काय करीत आहे ते?" पप्पू आपले डोळे पुशीत म्हणाला.

"बरं, ठीक." ते कबूतर म्हणाले, "मला एक सांग, तुझ्या ओळखीचा पप्पू नावाचा कुणी कळसूत्री बाहुला आहे का?"

"पप्पू?" पप्पू उठून उभा राहात म्हणाला, "मीच पप्पू आहे."

हे ऐकताच ते कबूतर जमिनीवर उतरले. एखाद्या कोंबड्याएवढे मोठे होते ते.

"तू बाळकोबाला ओळखतोस का पप्पू?" त्या कबुतराने पुढे विचारले.

"ओळखतो. का?" पप्पूने आश्चर्याने विचारले. "अरे, मी बाळकोबांचा मुलगा. त्यांना तू कुठे पाहिलंस का? मला त्यांच्याकडे घेऊन जातोस का?"

"तीन दिवसांपूर्वी मला ते समुद्रकिनारी भेटले होते." कबूतर म्हणाले.

"काय करीत होते ते तिथे?" पप्पूने उत्सुकतेने विचारले.

"एक बोट बांधीत होते ते." कबुतराने सांगितले. "गेले जवळजवळ तीन महिने बाळकोबा तुला सर्वत्र शोधीत होते. पण तू काही त्यांना कुठे दिसला नाहीस. तेव्हा कदाचित् तू दुसऱ्या देशाला गेला असशील असं वाटून समुद्रपार होण्यासाठी ते बोट बांधीत असावेत."

"इथून समुद्र किती लांब आहे?" पप्पूने अधीरतेने विचारले.

"खूप लांब आहे." कबुतराने उत्तर दिले.

"खूप? अरेरे! कबुतरासारखे मला पंख असते तर मी आत्ता उडून गेलो असतो माझ्या बाबांना भेटायला!" पप्पू म्हणाला.

"तुला त्यांच्याकडेच जायचं असलं तर मी तुला घेऊन जाईन." कबुतराने सुचविले.

"कसं घेऊन जाणार तू मला?" पप्पूने आश्चर्याने विचारले.

"कसं म्हणजे? माझ्या पाठीवरून घेऊन जाईन की मी तुला. तू काही फारसा जड नाहीस. चल, बैस माझ्या पाठीवर." कबुतराने पप्पूला सांगितले.

आणि कबुतर पुढे काही बोलायच्या अगोदरच पप्पू पटकन् कबुतराच्या पाठीवर बसला आणि म्हणाला, "चल माझ्या घोड्या टप् टप् टप्."

पप्पूला पाठीवर घेऊन कबूतर जमिनीपासून दूर झाले. आणि थोड्याच वेळात आकाशात उंच उंच जाऊ लागले, अगदी ढगांच्या पलीकडे. सहज म्हणून पप्पूने खाली पाहिले तो त्याला अगदी घेरी आल्यासारखे

झाले त्याने मग कबुतराच्या मानेला अधिक घट्ट धरून ठेवले.

सबंध दिवस ते कबूतर पप्पूला पाठीवर घेऊन उडत होते. संध्याकाळी ते पप्पूला म्हणाले, "पप्पू, मला फार तहान लागली आहे."

"आणि मलासुद्धा फार भूक लागली आहे." पप्पू म्हणाला.

"तर मग आपण दोघंही कबुतरखान्याजवळ काही वेळ थांबू या आणि नंतर पुढल्या मार्गाला लागू या. म्हणजे मग उद्या सकाळपर्यंत तरी समुद्रकाठी पोचू."

असे म्हणून पप्पू आणि कबूतर एका कबुतरखान्याजवळ आली. तेथे फक्त पाणी होते आणि एक लहान टोपलीभर चणे होते. पप्पूने चणे कधीच खाल्ले नव्हते. चणे पाहाताच त्याचे डोके उठे. पण त्या संध्याकाळी मात्र पप्पूने अगदी पोटभर चणे खाल्ले आणि तो कबुतराला म्हणाला, "चणे इतके चवदार असतात हे मला माहीत नव्हतं."

"अरे पप्पू," ते कबूतर म्हणाले, "खरी भूक लागली की पुढ्यात पडेल त्याला चव येते!"

खाणेपिणे झाल्यावर पप्पूने आणि कबुतराने आपला पुढला प्रवास चालू केला आणि बघता बघता ते अंतराळात दिसेनासे झाले.

पहाटे ते जेव्हा समुद्रकिनारी उतरले, तेहा त्यांना तेथे मोठी गर्दी झालेली दिसली. पप्पूने तेथे उभ्या असलेल्याच एका कोळ्याला विचारले, "काय हो कोळीदादा, काय झालं आहे?"

"काय सांगू तुला बाबा!" तो कोळी बोलू लागला, "कुणी एक म्हातारा आपल्या मुलाला शोधण्याकरता म्हणून होडीने दुसऱ्या गावी चालला आहे आणि आज समुद्र तर खवळला आहे. त्याची होडी बुडेल कदाचित!"

"कुठे आहे, कुठे आहे तो माणूस?" पप्पूने गडबडून विचारले.

"त्या तिकडे. दूर." त्या कोळ्याने समुद्रात दूरवर असलेल्या एका होडीकडे बोट दाखवीत म्हटले.

पप्पूने नीट निरखून पाहिले आणि तो ओरडला, "आँ! ते तर माझे बाबा!"

पण तितक्यात एक मोठी लाट आली आणि तिच्या तडाख्यासरशी ती होडी खालीवर झाली. तेव्हा पप्पू जोराने हात वर करून ओरडू लागला, "माझे बाबा, माझे बाबा! त्यांना कुणीतरी वाचवा हो!"

बाळकोबाने पप्पूचे हे ओरडणे ऐकले असेल की नाही माहीत नाही, पण त्यानेही होडीतून आपला हात हलवला. जणू त्याला म्हणायचे होते, 'माझ्या हातात असतं तर मी परत आलो असतो किनाऱ्याला!'

पुन्हा एक जोराची लाट आली आणि ती होडी दिसेनाशी झाली.

"गरीब बिचारा गेला!" तेथे जमलेल्यांपैकी एक कोळी म्हणाला.

पण तेवढ्यातच एक जोराची आरोळी तेथे जमलेल्या लोकांनी ऐकली. पप्पू ओरडत होता, "मी—मी माझ्या बाबांना वाचवणार!" तो पुन्हा ओरडला आणि त्याने धाडकन् त्या खवळलेल्या समुद्रात उडी टाकली. पप्पू लाकडाचा असल्यामुळे पाण्यावर जोराने वाहू लागला. लाटांच्या तडाख्यांमुळे पप्पू एकदा वर येई, तर दुसऱ्या वेळी खाली जाई. आणि शेवटी बघता बघता पप्पू काठावरच्या लोकांनाही दिसेनासा झाला.

"झालं! हाही गेला त्या म्हाताऱ्याच्या पाठोपाठ!" काठावर जमलेल्या कोळ्यांपैकी एकाने म्हटले आणि मग इतर बाकीचे कोळीही आपापल्या कामाला लागले.

## ११

आपल्या बुडत असलेल्या वडिलांना मदत करण्याकरिता म्हणून पप्पू कित्येक तास पोहत होता. पण त्याला काही ते सापडले नाहीत. अशा रीतीने काही वेळ गेल्यावर थोड्याच अंतरावर पप्पूला जमीन दिसू लागली. ते एक बेट होते आणि ते आपल्या नजरेच्या टापूत येताच पप्पू पुन्हा जोराने पोहू लागला.

पप्पू त्या बेटावर पोचला आणि आजूबाजूला कोणी आहे की काय हे पाहाण्याकरिता त्याने चारी बाजूंना आपली नजर फिरविली. पण त्याला तेथे कोणीही दिसले नाही.


"काय बरं नाव असावं ह्या बेटाचं?" पप्पू स्वतःशीच बोलू लागला. 'कसं कळायचं? इथे तर कोणीच नाही."

आपण कोठे आलो आहोत हे न समजल्यामुळे पप्पू अगदी रडवेला झाला. पण तितक्यात त्याला किनाऱ्या-किनाऱ्याने एक मोठा मासा पोहत जाताना दिसला. माशाला पाहाताच त्याच्या मागोमाग जात पप्पूने विचारले, "अहो मासेराव, जरा थांबा."

तो मोठा मासा थांबला. "का रे बाबा! काय हवंय तुला?" मासेरावाने पप्पूला विचारले.



पप्पू ओरडत होता, "मी—मी माझ्या बाबांना वाचवणार!"



"अहो मासेराव, जरा थांबा."



"पप्पू, पप्पू, तू नवीन बातमी ऐकलीस का?"

'अरे पप्पू, समुद्रावर एक मोठा मासा आला आहे—अगदी डोंगराएवढा मासा!' "आम्ही सगळ्यांनी तो मोठा मासा आताच पाहायला जायचं ठरवलं आहे. तू येतोस का?" त्या मुलाने पप्पूला विचारले.

"अहो मासेराव, आजूबाजूला कुठे वस्ती आहे का ह्या बेटावर?" पप्पूने विचारले.

"हो, आहे तर काय झालं." त्या माशाने उत्तर दिले. "असा सरळ जा आणि मग उजव्या हाताला वळ, की काही अंतरावर तुला गाव लागेल."

"आणखी एक सांगा मासेराव," पप्पू पुढे म्हणाला, "तुम्ही दिवस-रात्र समुद्रात पोहता, तेव्हा माझ्या वडलांना कुठे पाहिलंत का?"

"कोण तुझे वडील?" माशाने विचारले.

"बाळकोबा. काल रात्री ते एका होडीत बसून मला शोधण्याकरता म्हणून निघाले आणि समुद्र तर खवळलेला होता." पप्पू म्हणाला.

"खवळलेल्या समुद्रात ते निघाले असतील," माशाने पप्पूला सांगितले, "तर मग त्यांची होडी उलटून ते केव्हाच देवमाशाच्या तावडीत सापडले असतील!"

"देवमाशाच्या तावडीत?" पप्पूने घाबरून विचारले.

"हो." त्या माशाने उत्तर दिले. "गेले काही दिवस त्या देवमाशाने फार धुमाकूळ घातला आहे ह्या समुद्रात."

"बापरे!" पप्पू कळवळला आणि त्या माशाचे आभार मानून त्याने सांगितलेल्या गावाच्या रोखाने जाऊ लागला.

काही वेळ चालल्यानंतर पप्पूला तो गाव दिसला. तो जवळ आला तेव्हा त्याने पाहिले, गावाच्या बाहेर एक पाटी लावली होती आणि तीवर त्या गावाचे नाव लिहिले होते: 'उद्योगी लोकांचे गाव.'

पप्पूने पाहिले, गावातले सारे लोक घाईत, गडबडीत होते. आपापल्या उद्योगाला लागले होते. रस्त्यावर एकही माणूस रिकामा दिसत नव्हता.

"बापरे!" आळशी पप्पू स्वतःशीच उद्गारला, "ह्या गावात आपलं कसं काय जमायचं? माझा जन्म काही असा काम करण्याकरता नाही."

पप्पूने आळोखेपिळोखे दिले. मोठी जांभई दिली. त्याला भूक

लागली होती. बाळकोबाला शोधण्याकरता समुद्रात उडी टाकल्यापासून त्याने काही खाल्ले नव्हते. अगदी चणेसुद्धा नाही. आणि भूक तर त्याला फार लागली होती. पण खायचे काय?

खायला मिळवायचे दोनच मार्ग पप्पूपुढे होते. एक म्हणजे पोटाकरता काम करणे, आणि दुसरे म्हणजे भीक मागणे. पप्पूला भीक मागायची लाज वाटत होती. कारण त्याला सांगण्यात आले होते, की भीक ही फक्त अपंग किंवा अगदी म्हाताऱ्या माणसांनीच मागायची असते. बाकीच्या साऱ्यांनी काम करून आपली भाकर मिळवायची असते.

पप्पू अशा ह्या विचारात असतानाच त्याच्या बाजूने त्याने एक हातगाडी जाताना पाहिली. त्या हातगाडीत अगदी खच्चून कोळसे भरले होते आणि एक मध्यम वयाचा माणूस धापा टाकीत ती गाडी ओढीत होता. त्या माणसाच्या चेहऱ्यावरून पप्पूला वाटले, की तो दयाळू असावा; आणि म्हणूनच पप्पूने त्याला विचारले, "अहो, मला एक आणा देता का? मला फार भूक लागली आहे."

"एकच आणा का? दोन आणे देतो!" हातगाडी ओढणारा तो माणूस पप्पूला म्हणाला, "पण मला ही गाडी ओढायला मदत कर अगोदर."

"छे छे. मी नाही गाडी ओढणार. माझं काम नाही ते." पप्पू म्हणाला.

"गाडी ओढणं तुझं काम नसेल," तो माणूस म्हणाला, "तर मग तुला पैसे देणंही माझं काम नाही!" आणि एवढे बोलून तो माणूस एकटाच आपली गाडी ओढत ओढत निघून गेला.

अशा तऱ्हेने पप्पू तेथे उभा असताना दुसरे आणखी बरेच लोक तेथून निघून गेले. त्या प्रत्येकाकडे पप्पूने पैशांकरता हात पसरला. पण त्यांपैकी कोणीही त्याला मदत केली नाही. उलट त्यांनी पप्पूला विचारले, "भीक मागायची तुला लाज कशी नाही वाटत? काही तरी काम

शीक आणि स्वत:ची भाकरी स्वत: मिळव."

काही वेळाने एक म्हातारी बाई त्या रस्त्याने आली. तिच्या हातात पाण्याने भरलेल्या दोन बालद्या होत्या आणि ती हळूहळू पावले टाकीत चालली होती. पप्पूने तिला पाहिले आणि म्हटले, "आजी, आजी, मला थोडं पाणी देता का प्यायला?"

"हो हो. तुला लागेल तेवढं पी." ती म्हातारी जमिनीवर बालद्या ठेवीत म्हणाली.

एखाद्या माशाप्रमाणे पप्पू पाणी प्यायला. त्याने आपले तोंड पुसले आणि तो स्वत:शीच म्हणाला, "माझी तहान भागली. अशीच भूक भागली असती तर?"

त्या म्हातारीने ते पप्पूचे शब्द ऐकले आणि ती त्याला म्हणाली, "बाळ, तू मला ह्या बालद्या माझ्या घरापर्यंत घेऊन जायला मदत करशील, तर मी तुला खूप खायला देईन. अगदी तुला आवडेल असं. गोडगोड."

पप्पू विचार करू लागला, 'काय करावं?'

ती म्हातारी बोलतच होती, "आज मी पुरणपोळ्या केल्या आहेत. मला एवढी मदत कर म्हणजे मग मी तुला चांगल्या मोठ्या चार पुरण-पोळ्या देईन."

पुरणपोळ्यांचे नाव काढताच पप्पूच्या तोंडाला पाणी सुटले. तो पटकन् म्हणाला, "चला आजी, मी तुम्हांला मदत करतो ह्या बालद्या घरी न्यायला."

पप्पूने एक बादली उचलली आणि तो त्या म्हातारीबरोबर चालू लागला.

थोड्या वेळाने ती म्हातारी आणि पप्पू घरी पोचली. कबूल केल्या-प्रमाणे त्या म्हातारीने पप्पूला मोठ्या चार पुरणपोळ्या दिल्या. पप्पू पुरण-पोळ्यांवर अगदी तुटून पडला आणि हां हां म्हणता त्याने त्या संपवल्या.

त्याने पाण्याचे भांडेही रिकामे केले आणि ढेकर देऊन, निरोप घेण्याकरता म्हणून त्याने म्हातारीकडे पाहिले, तेव्हा त्याच्या तोंडून 'आँ' असा आश्चर्याचा शब्दच बाहेर पडला.

"काय रे, काय झालं असं 'आँ' करायला?" त्या म्हातारीने पप्पूला विचारले.

"म्हणजे—म्हणजे—आजी, तुम्ही माझ्या ओळखीच्या एका परी-सारख्या दिसता. आजी, तुम्ही खरंच परी आहात का? सांगा ना. सांगा ना. खरंच तुम्ही परी आहात का? परीताईला सोडल्यापासून माझे किती हाल झाले!" असे बोलून पप्पूने त्या म्हातारीच्या गळ्याला मिठी मारली आणि तो रडू लागला.

त्या म्हाताऱ्या बाईला त्याची फार दया आली आणि तिने पप्पूला खरे ते सांगितले. ती पूर्वीचीच दयाळू परी होती.

"पण तू एवढी म्हातारी कशी झालीस?" पप्पूने विचारले, "मी तुला पहिल्यांदा पाहिलं, तेव्हा तू काही अशी नव्हतीस. सांग ना मला, तू एकदम आजी कशी झालीस ते."

"तीच तर गंमत आहे!" परीने उत्तर दिले.

"मला सांग ना. मग मीसुद्धा मोठा होईन तुझ्यासारखा." पप्पूने परीला विनंती केली.

"अंहं, तुझ्यासारख्या लाकडी कळसूत्री बाहुल्याला मोठं होता ययचंच नाही मुळी. तू शेवटपर्यंत असा कळसूत्री बाहुलाच राहाणार." ती परी म्हणाली.

"पण मला आता कंटाळा आला आहे ना कळसूत्री बाहुला म्हणून राहायचा." पप्पूने तक्रार केली. "मला आता चांगला मुलगा व्हायचं आहे."

"तसा तू होशीलही. पण त्याकरता तुला खूप गोष्टी कराव्या लागतील." परी म्हणाली.

"म्हणजे काय करावं लागेल?" पप्पूने अधीरतेने विचारले.

"पहिल्यांदा तर अगदी सोपी गोष्ट आहे." परी म्हणाली. "पहिल्यांदा तुला एखाद्या चांगल्या मुलाप्रमाणे वागावं लागेल."

"म्हणजे? मी चांगला मुलगा नाही असं तुला म्हणायचंय का परीताई?" पप्पूने विचारले.

"तू मुळीच चांगल्या मुलासारखा वागत नाहीस. चांगली मुलं आज्ञाधारक असतात. ती नेहमी नियमितपणे शाळेत जातात. आपला अभ्यास करतात. कधीच खोटं बोलत नाहीत. मोठ्या माणसांचं ऐकतात. —पप्पू, तू असा वागतोस का?"

पप्पूला वाईट वाटले. तो क्षणभर काहीच बोलला नाही. परीने जेव्हा त्याला परत तोच प्रश्न विचारला तेव्हा पप्पू म्हणाला,

"परीताई, आजपासून मी नीट वागेन. शाळेत जाईन. अभ्यास करीन. नि तू सांगशील तसा वागेन. अगदी चांगला मुलगा होईन. पण परीताई, मला माझे बाबा कुठे आहेत ते सांगतेस का?"

"मला माहीत नाही ते कुठे आहेत ते." परीने उत्तर दिले.

"मला ते केव्हातरी दिसतील का?" पप्पूने अजीजीने विचारले.

"होय, तुझी त्यांची भेट होईल. पण एवढ्यात नाही."

दुसऱ्या दिवशी कबूल केल्याप्रमाणे पप्पू शाळेत गेला. त्याने जेव्हा शाळेत प्रथम प्रवेश केला तेव्हा सारी मुले त्याला हसली, कारण पप्पू हा लाकडाचा कळसूत्री बाहुला होता. साऱ्या मुलांना त्याची मोठी गंमत वाटली. त्या शाळेत काही खोडकर मुले होती. त्यांच्यापैकी एकाने पप्पूची टोपीच उडवली. दुसऱ्याने त्याचा अंगरखा खेचला. तिसर पप्पूला पाठीमागून चिमटा घेऊ लागला. पण पप्पू लाकडाचा असल्यामुळे त्याला चिमटा लागलाच नाही. ह्या अशा वात्रट मुलांपैकी एक, पप्पू ज्या बाकावर बसला होता तेथे मागून आला आणि त्याने बाकाखाली जाऊन पप्पूच्या पायाला दोरी बांधायचा प्रयत्न केला. पण पप्पू एव्हाना

चांगलाच सावध झाला होता. त्या बाकाखालच्या मुलाने पप्पूच्या पायाला हात लावताच पप्पूने मागच्या मागे लाथ झाडली, ती नेमकी त्या बाकाखाली बसलेल्या मुलाच्या नाकावर लागली. तेव्हा तो मुलगा नाक चोळीत निघून गेला. तो मग पुन्हा काही पप्पूच्या वाटेला गेला नाही.

मग मात्र शाळेतील इतर मुले पप्पूला त्रास देईनाशी झाली. शाळेतील मास्तरांनाही पप्पू फार आवडला. कारण वर्गात काय शिकवतात, ह्याकडे तो नीट लक्ष देत होता, नियमितपणे शाळेत जात होता आणि आपला अभ्यासही अगदी चोख करीत होता. पण त्याच्यात एक गोष्ट वाईट होती. त्याने विचार केल्याशिवाय वऱ्याच मुलांशी मैत्री जोडली होती आणि ह्या मुलांतच काही उनाड मुले होती.

एके दिवशी पप्पू नित्याप्रमाणे शाळेला चालला असताना वाटेतच त्याला त्याचे काही उनाड मित्र भेटले आणि त्याच्यांपैकी एक मुलगा म्हणाला, "पप्पू, पप्पू, तू नवीन बातमी ऐकलीस का?"

पप्पूने जेव्हा नकारार्थी मान हलविली, तेव्हा तो मुलगा पुढे म्हणाला, 'अरे पप्पू, समुद्रावर एक मोठा मासा आला आहे—अगदी डोंगराएवढा मासा!"

"बरं, मग?" पप्पूने विचारले.

"आम्ही साऱ्यांनी तो मोठा मासा आत्ताच पाहायला जायचं ठरवलं आहे. तू येतोस का?" त्या मुलाने पप्पूला विचारले.

"अंहं. मी नाही. मला शाळा बुडवायची नाही." पप्पूने उत्तर दिले.

"अरे शाळा तर रोजचीच आहे. एक दिवस गेला नाहीस शाळेला तर काय बिघडलं? उद्या जाता येईल शाळेला." तो वात्रट मुलगा म्हणाला.

"पण मास्तर काय म्हणतील? माझी परीताई काय म्हणेल?" पप्पूने शंका प्रदर्शित केली.

"मास्तरना आपण सांगायचं नाही कुठे जातो ते आणि तुझ्या परी-ताईलाही काही कळायचं नाही. पप्पू, आमचं ऐक! एवढा मोठा मासा पुन्हा कधी पाहायला मिळायचा नाही!" घोळक्यातला दुसरा मुलगा म्हणाला.

"छे, नाही बुवा पटत आपल्याला. शाळेत जायलाच हवं!" पप्पू निर्धाराने म्हणाला. "तुम्ही जा आपले तो मासा पाहायला. मी संध्या-काळी शाळा सुटल्यावर पाहीन तो."

"काय विचित्र आहे रे हा पप्पू!" तो वात्रट मुलगा म्हणाला, "ह्याला खरोखरच काही कळत नाही! अरे वेड्या, तुला असं वाटलं का, की तो एवढा मोठा डोंगराएवढा मासा संध्याकाळपर्यंत तू येण्याची वाट पाहील म्हणून? त्या माशाचं काय, लहर बदलली तर संध्याकाळपर्यंत तो निघूनही जाईल!"

पप्पूला त्या वात्रट मुलाचे बोलणे पटल्यासारखे दिसले. तो थोडा वेळ गप्प राहिला आणि मग त्या मुलांना म्हणाला, "बरं, चला. मी पण येतो तुमच्याबरोबर तो मासा पाहायला. पण इथून समुद्र किती दूर आहे?"

"हात्तिच्या! अगदी जवळ आहे." दुसरा एक मुलगा म्हणाला.

"मग चला तर, पळा. सगळ्यांत जोरात धावेल तो पहिला!" पप्पू म्हणाला.

आणि मग पप्पू आणि ती उनाड मुले शाळा चुकवून समुद्राकडे पळाली.

काही वेळाने सारी मुले समुद्रावर पोचली आणि इकडेतिकडे पाहू लागली. एक मुलगा म्हणाला, "इकडे होता मासा." "त्या तिकडे होता." दुसरा म्हणाला. "नाही, नाही. इकडे होता." आणखी तिसऱ्याने दुसरीच दिशा दाखवली. मग सारीच मुले हसू लागली. पप्पू बावरला. त्याला कळेना, ती मुले का हसतात ते. तेव्हा तर ती मुले एकमेकांकडे पाहून जास्तच हसू लागली. शेवटी पप्पू चिडला आणि त्याने रागाने विचारले, "हसायला काय झालं?"

"हसू नको तर काय करू !" तो वात्रट मुलगा म्हणाला, "तू इतका मूर्ख असशील अशी आमची कल्पना नव्हती!"

"म्हणजे ?" पप्पूने आश्चर्याने विचारले.

"तू अगदीच मूर्ख आहेस पप्पू!" तो मुलगा म्हणाला, "कसला मासा नि कसलं काय ! अरे, आम्हांला तुझी शाळा चुकवायची होती, म्हणूनच आम्ही तुला तसं सांगितलं. कशी फजिती केली तुझी ! बरं, अच्छा. आमचं काम झालं. आम्ही जातो." आणि असे म्हणून ती सारी मुले पप्पूला एकट्याला तेथे सोडून निघून गेली.

बिचारा पप्पू ! त्याला त्या मुलांच्या वागणुकीचे फार वाईट वाटले. तो हळूहळू घरी परतला.

## २०

पप्पू अगदी नियमितपणे शाळेत जाऊ लागला आणि वर्गातल्या दुसऱ्या अनेक मुलांनी त्याला उनाडक्या करायची सवय लावायचा प्रयत्न केला, तरी तो काही त्यांना दाद देईना. तो व्यवस्थित रीत्या अभ्यास करून चांगला मुलगा व्हायच्या मार्गाला लागला.

पप्पू

परीताईनेसुद्धा पप्पूला सांगितले, की आणखी काही दिवस तो तसाच वागला, तर त्याचे लाकडाच्या कळसूत्री बाहुल्यातून चांगल्या मुलात रूपांतर होईल.

एके दिवशी पप्पूने परीताईला विचारले, "परीताई, मी माझ्या मित्रांना खेळायला बोलावू का?"

परीताईने पप्पूच्या म्हणण्याला रुकार दिला आणि पप्पू जेव्हा आपल्या मित्रांना बोलावण्याकरिता म्हणून बाहेर जाऊ लागला, तेव्हा परीताई त्याला म्हणाली, "हे बघ पप्पू, साऱ्या मित्रांना बोलावून संध्याकाळ व्हायच्या आत परत ये, बरं का."

"हा मी आत्ताच परत येतो बघ!" पप्पू म्हणाला आणि घरातून बाहेर पडला.

काही वेळातच पप्पूने आपल्या साऱ्या मित्रांना खेळायला यायचे निमंत्रण देऊन टाकले. पप्पूने खेळायला बोलावलेल्या मित्रांत जसे चांगले मित्र होते, तसे काही वाईटही होते. त्या वाईट मुलांपैकी एका वात्रट मुलाचे नाव होते चंदू. चंदू हा सबंध शाळेत उनाड आणि व्रात्य म्हणून प्रसिद्ध होता आणि तरीही पप्पूची आणि त्याची चांगलीच दोस्ती होती. पप्पू घराहून बोलावणे करण्याकरता म्हणून जो निघाला, तो प्रथम चंदूच्या घरी गेला होता, पण चंदू घरात नसल्यामुळे, दुसऱ्या इतर साऱ्या मित्रांना बोलावून, पप्पू पुन्हा चंदूच्या घरी परतला. पण ह्या वेळीही चंदू घरी नव्हता. कोठे बरे ह्याला शोधावा? पप्पूला विचार पडला. त्याने चंदूचा सगळ्या ठिकाणी शोध केला आणि शेवटी तो एका जरा दूरवरच असलेल्या झोपडीजवळ आला, तेव्हा त्याला चंदू तेथे दिसला.

"अरे चंदू, तू इथे काय करीत आहेस?" पप्पूने विचारले.

"मध्यरात्र व्हायची वाट पाहातो आहे मी." चंदूने उत्तर दिले.

"कशाला?"

"मी बाहेर जाणार आहे."

क्र. 2263 22/10/65
विषय

"कुठे?"

"खूप दूर, अगदी दूर."

"अरे, मी तीन वेळा तुझ्या घरी जाऊन आलो."

"कशाला?"

"तुला माझ्या घरी खेळायला बोलवायला."

"छे, मला नाही जमायचं. मी आज रात्रीच एका दूरच्या गावी जाणार आहे."

"नाव काय त्या गावाचं?"

"शेट्यांचं गाव. तू येतोस का माझ्याबरोबर?"

"मी नाही रे बाबा!" पप्पूने उत्तर दिले.

"अगदी मूर्ख आहेस तू पप्पू!" चंदू म्हणाला, "मी तुला सांगतो, तू ये माझ्याबरोबर. नाही आलास तर मग तुझं तुलाच वाईट वाटेल. अरे, ह्या शेट्यांच्या गावासारखा गाव तुला कुठे दिसायचा नाही. त्या गावात शाळा नाहीत, अभ्यासाचा लकडा मागे नाही. रोज रविवार, रोज सुट्टी! फार गमतीदार गाव आहे तो!"

"पण मग शाळा नाही, अभ्यास नाही, तर तिथली मुलं सारा दिवस घालवतात तरी कसा?" पप्पूने कौतुकाने विचारले.

"सबंध दिवस तिथली मुलं सारखी खेळत असतात." चंदूने माहिती पुरवली.

"खरंच, काय मजा असेल नाही!" पप्पू आनंदाने म्हणाला.

"मग काय करतोस तू? येतोस का तू माझ्याबरोबर त्या शेट्यांच्या गावात?" चंदूने विचारले.

"नाही, नाही, नाही. मुळीच नाही." पप्पू म्हणाला, "मी माझ्या परीताईला सांगितलं आहे, की मी आता ह्यापुढे चांगल्या मुलांसारखा वागणार आहे. मी नाही येत तुझ्याबरोबर. बरं, चल, मी जातो आता. संध्याकाळ होत चालली."

"अरे, पण इतक्या लवकर कुठे चालला आहेस? जरा थांब." चंदूने पप्पूला आग्रह केला.

"नाही बुवा! मी परीताईला सांगून आलो आहे, संध्याकाळ व्हायच्या आत परत येईन म्हणून!" पप्पू म्हणाला.

"अरे, पण जरा थांब, पाच मिनिटं!" चंदूने पुन्हा आग्रह केला.

"नको, नको, उशीर होईल मला." पप्पू म्हणाला, "परीताई माझ्यावर रागावेल."

"अरे, रागावली तर रागावू दे परीताई!" चंदू म्हणाला, "रागावेल रागावेल आणि गप्प बसेल झालं!"

"बरं, पण चंदू, तू त्या शेट्यांच्या गावात एकटाच चालला आहेस का?" पप्पूने उत्सुकतेने विचारले.

"एकटा?" चंदूने आश्चर्याने विचारले, "अरे पप्पू, माझ्याबरोबर दुसरीही खूप मुलं यायची आहेत."

"पायी जाणार का?"

"नाही. एक गाडी येणार आहे न्यायला."

"खरंच का रे शाळा नाहीत त्या गावात?"

"अगदी खरं, सूर्यप्रकाशाइतकं खरं!" चंदूने उत्तर दिले.

"काय मजा असेल नाही तिथे! मला तर ते गाव आत्ताच डोळ्यांसमोर दिसायला लागलं आहे!"

"मग येत का नाहीस माझ्याबरोबर तू तिथे?" चंदूने विचारले.

"नको, मी परीताईला वचन दिलं आहे, की मी चांगल्या मुलांप्रमाणे वागणार आहे."

"बरं, मग जा तर." चंदू म्हणाला, "आपल्या वर्गातल्या साऱ्या मुलांना विचारलं आहे म्हणून सांग. साऱ्यांना सांग, मी शेट्यांच्या गावात गेलो आहे म्हणून."

"बरं, बरं, सांगेन. अच्छा, मी जातो." पप्पूने चंदूचा निरोप घेतला

आणि तो दोन पावले पुढे गेलासुद्धा, पण तेवढ्यात तो मागे फिरला आणि त्याने चंदूला विचारले, "खरंच का रे तिथे रोज रविवार असतो?"

"अगदी खरं!" चंदूने उत्तर दिले.

"आणि शाळासुद्धा नाही? अभ्याससुद्धा नाही?"

"काऽऽही नाही!" चंदू अगदी शांतपणे म्हणाला.

"काय मजा असेल त्या गावी!" पप्पू स्वतःशीच उद्गारला आणि मग अगदी निश्चयाने म्हणाला, "बरं, अच्छा चंदू, आता खरंच जातो हं."

"बरं, अच्छा." चंदूने प्रत्युत्तर दिले.

"तू निघणार केव्हा?"

"आता थोड्याच वेळात."

"एवढ्यातच? खरंच, तुला जायला जरा वेळ असता, तर मी थांबलोही असतो." पप्पू म्हणाला.

"आणि मग परीताई रागावली असती ती?" चंदूने खोचकपणे विचारले.

"आता नाहीतरी उशीर झालाच आहे, मग तासभर अगोदर काय किंवा तासभर नंतर काय, सारखंच."

"आणि परीताई मग तुझ्यावर रागावली तर?" चंदूने शंका प्रदर्शित केली.

"रागावली तर रागावली!" पप्पू म्हणाला, "तू म्हणालास त्याप्रमाणे रागावेल रागावेल आणि गप्प बसेल!"

एव्हाना रात्र होऊन गेली होती. सगळीकडे अंधार गुडूप झाले होते. इतक्यात चंदूला आणि पप्पूला त्यांच्यापासून दूर अंतरावर प्रकाश दिसू लागला आणि तुतारी वाजल्याचाही आवाज त्यांच्या कानी पडला. पण ह्या तुतारीचा आवाज अगदीच बारीक होता. एखादा डास गुणगुणतो ना, तेवढा.

"ती बघ आली गाडी!" चंदू उद्गारला आणि तो उड्या मारू लागला.

"कुठे आहे?" पप्पूने अधीरतेने विचारले.

"ती बघ, ती बघ. तो प्रकाश दिसतो आहे ना, तो त्या गाडीचाच." चंदू म्हणाला.

"पण चंदू, खरंच का रे त्या शेट्यांच्या गावात शाळा नाहीत?" पप्पूने पुन्हा विचारले.

"आता किती वेळा सांगू तुला तिथे शाळा नाहीत म्हणून?" चंदू त्रासून म्हणाला.

"खरंच! काय गंमत असेल तिथे, नाही?" पप्पू उद्गारला आणि समोरूनच येणाऱ्या गाडीकडे तो पाहू लागला.

## २१

शेवटी एकदाची ती गाडी चंदू आणि पप्पूच्या जवळ येऊन पोचली, अगदी आपल्या चाकांचाही आवाज न करता. निरनिराळ्या रंगांची पण एकाच आकाराची बारा गाढवे ती गाडी ओढत होती. पण सगळ्यात गमतीदार गोष्ट ही होती, की त्या गाढवांनी माणसांसारखे बूट घातले होते!

आणि गाडीवान? गाडीवान तर पाहाण्यासारखाच होता. अगदी लाल भोपळ्यासारखे शरीर असलेला. संत्र्यासारख्या चेहऱ्याचा आणि सदैव

हसत असणारे लहान तोंड असलेला! त्या गाडीवानाचा आवाजसुद्धा मोठा गोड होता. एखादे मांजर आपल्या मालकिणीची मर्जी सांभाळण्या-करता तिच्याभोवती फिरत जसा आवाज काढते ना, तसा आवाज होता त्या गाडीवानाचा.

ती गाडी लहान लहान मुलांनी पूर्ण भरून गेली होती. मुले अगदी एकमेकांच्या अंगावर पडली होती. पण कोणी काही तक्रार करीत नव्हते, रागाचा एक शब्दही कोणी उच्चारीत नव्हते, इतकी गाडीतील ती सारी मुले त्या शेट्यांच्या गावात जायला उत्सुक झाली होती. त्या शेट्यांच्या गावात—जेथे शाळा नव्हत्या, मास्तर नव्हते, अभ्यास नव्हता, अशा त्या गावात—सारी मुले त्या गाडीतून चालली होती आणि त्या नादातच ती मुले सारे काही विसरली होती.

गाडी पूर्णपणे थांबली आणि गाडीवानाने चंदूला विचारले, "काय रे, तुला यायचंय का शेट्यांच्या गावात?"

"हो, हो." चंदूने अधिरतने उत्तर दिले.

"पण हे बघ, गाडीत मुळीच जागा नाही. तुला दिसतंच आहे." गाडीवान म्हणाला.

"काही हरकत नाही. मी गाडीच्या मागे बसेन." चंदूने उत्तर दिले आणि गाडीवान काही म्हणण्यापूर्वी चंदू मागे जाऊन बसलासुद्धा.

"आणि बाळ तू? येणार का शेट्यांच्या गावात?" गाडीवानाने पप्पूला अगदी प्रेमळपणे विचारले.

"अं हं, मी नाही येत शेट्यांच्या गावात." पप्पू म्हणाला, "मला घरी जायचं आहे, चांगला मुलगा व्हायचं आहे."

"छान, मग जा तू घरी तर." गाडीवान पप्पूला म्हणाला.

तितक्यात चंदू गाडीच्या मागून ओरडला, "पप्पू, माझं ऐक! शेट्यांच्या गावी चल माझ्याबरोबर. खूप मजा येईल. ऐक माझं."

पप्पूला काय करावे हे कळेना. जावे की न जावे? त्याला विचार

पडला. इतक्यात पुन्हा त्याच्या कानावर चंदूचे शब्द पडले, "पप्पू, चल लवकर. खूप मजा येईल. शाळा नाही, मास्तर नाहीत, अभ्यास नाही."

चंदूच्या ह्या बोलण्याने मात्र पप्पू विरघळला!

तो गाडीवानाला म्हणाला, "मीसुद्धा येतो शेट्यांच्या गावात. मला थोडी जागा द्या गाडीत."

"गाडीत जागा मुळीच नाही." गाडीवान म्हणाला, "पण तू येणारच असशील तर माझ्या जागेवर बैस म्हणजे झालं."

"आणि तुम्ही कुठे बसणार?" पप्पूने विचारले.

"मी पायी चालेन." गाडीवानाने उत्तर दिले.

"अं हं, तसं नको." पप्पू म्हणाला, "तुम्ही तुमच्या जागेवरच बसा. मी ह्या बारा गाढवांपैकी एकावर बसतो."

गाडीवान पप्पूच्या म्हणण्याला कबूल झाला. पप्पू उजव्या हाताच्या शेवटल्या गाढवावर बसण्याकरता म्हणून त्याच्या जवळ गेला आणि तो त्या गाढवावर बसण्याचा प्रयत्न करू लागताच त्या गाढवाने पप्पूला जोराची लाथ मारली. पप्पू कोठल्या कोठे उडाला!

आणि मग गाडीतील ती सारी मुले इतक्या मोठ्याने हसली, की काही विचारू नका!

पण गाडीवान मात्र मुळीच हसला नाही. तो आपल्या जागेवरून खाली उतरला आणि त्या बंडखोर गाढवाच्या जवळ गेला. त्या गाढवाच्या कानात जणू काही तरी सांगायचे आहे अशाकरता म्हणून गाडीवानाने त्या गाढवाच्या एका कानाजवळ आपले तोंड नेले आणि इतक्या कडकडून त्या गाढवाच्या कानाचा चावा घेतला, की त्या गाढवाचा अर्धा कान तुटून त्या गाडीवानाच्या तोंडात आला.

"हं, आता बस ह्या गाढवावर," गाडीवान पप्पूला म्हणाला, "आता ते तुला त्रास द्यायचं नाही."

आणि मग खरेच त्या गाढवाने पप्पूला त्रास दिला नाही. पप्पू उडी मारून त्या गाढवावर बसला. गाडी निघाली. अगदी वाऱ्याच्या वेगाने, नदी–नाले ओलांडीत, दऱ्याखोऱ्या पार करीत गाडी निघाली. गाडी इतक्या जोरात जरी चालली होती, तरी पप्पूच्या कानात कोणीतरी गुणगुणत होते, "वेड्या पप्पू, तू आता तुझ्या मर्जीप्रमाणे वागत आहेस, पण पुढे तुला पश्चात्ताप होईल!"

कोण बोलत आहे म्हणून घाबऱ्या घाबऱ्या पप्पू इकडेतिकडे पाहू लागला, पण त्याला कोणीच कोठे दिसेना. फक्त गाडीवानच कसलेसे गाणे गुणगुणत होता!

काही वेळ असा गेल्यावर पुन्हा पप्पूच्या कानावर शब्द पडले, "मूर्खा पप्पू, नीट लक्षात ठेव. जी मुलं शाळेत जात नाहीत, अभ्यास करीत नाहीत आणि फक्त हुंदडण्यातच दिवस घालवतात, त्यांचं कधीच भलं होत नाही. अरे पप्पू, मी अगदी माझ्या अनुभवावरून बोलत आहे. आत्ता तुला बरं वाटत असेल, पण मग एक दिवस असा येईल, की त्या दिवशी तूही माझ्यासारखाच रडशील!" आणि मग खरेच पप्पूच्या कानांवर कोणीतरी रडत असल्याचा आवाज येऊ लागला.

पप्पूने आश्चर्याने इकडेतिकडे पाहिले आणि दचकून तो त्या गाढवावरून खाली उतरला. गाडीही ताबडतोब थांबली. इतक्यात पुन्हा पप्पूच्या कानांवर रडण्याचा आवाज आला. पप्पूने पाहिले, तो त्याला दिसले, की आपल्या पुढ्यातले गाढवच रडत आहे. त्याला आश्चर्य वाटले. तेव्हा त्याने गाडीवानाला विचारले, "काय हो, हे गाढव रडतंय का?"

"रडू दे त्याला." गाडीवान म्हणाला, "तू त्याच्याकडे लक्ष देऊ नकोस."

"तुम्ही त्याला बोलायलाही शिकवलं आहे वाटतं?" पप्पूने विचारले.

"मी नाही त्याला बोलायला शिकवलं." गाडीवान म्हणाला, "हे

गाढव काही वर्षं विद्वान कुत्र्यांच्या सहवासात होतं. तिथे ते बोलायला शिकलं. बरं, ते जाऊ दे. चल, तू परत बस त्याच्यावर. खूप लांब जायचं आहे आपल्याला."

पप्पू पुन्हा त्या गाढवावर बसला आणि त्या गाडीवानाने गाडी सोडली, अगदी भरधाव वेगाने.

आणि मग पहाटेच्या सुमारास मुलांनी ठासून भरलेली ती गाडी शेट्यांच्या गावात आली.

शेट्यांचे गाव हे दुसऱ्या इतर गावांपेक्षा अगदी वेगळे होते. त्या गावात सारी मुलेच राहात होती. फक्त आठ ते चौदा वर्षांची. गावातील रस्त्यांवर अगदी डोके पिकून जाईल इतकी गडबड आणि गोंगाट होता. जिकडे नजर फेकावी तिकडे मुलांचे घोळकेच दिसत होते. काही मुले गोटयांनी खेळत होती, तर काही लगोऱ्यांनी. काही सिगरेटच्या पाकिटांनी खेळत होती, तर काही चेंडूने. दुसरी काही लपंडाव खेळत होती, खो-खो खेळत होती, हुतूतू खेळत होती. काही गाणी म्हणत होती. तर काही उगाचच ओरडत होती. कोणी नाना पक्ष्यांचे आवाज काढीत होती. थोडक्यात, सगळीकडे नुसता हलकल्लोळ माजून राहिला होता.

गाडी थांबताच चंदू, पप्पू आणि त्याचे अगणित दोस्त खाली उतरले आणि त्या शेट्यांच्या गावातील इतर मुलांत चटकन मिसळून गेले. जणू त्या साऱ्यांची फार दिवसांची ओळख होती!

—आणि ह्या अशा हसण्या-खेळण्यात तासांमागून दिवस आणि दिवसांमागून आठवडे, अगदी विजेप्रमाणे निघून गेले.

"किती छान आहे हा गाव!" पप्पू एके दिवशी चंदूला म्हणाला, "जिकडेतिकडे मौजच मौज!"

"हो, पण तू पहिल्यांदा इथे यायला तयार नव्हतास!" चंदूने आठवण दिली, "तुला परत घरी जायचं होतं. शाळेत जायचं होतं. अभ्यास करायचा होता. चांगला मुलगा व्हायचं होतं. पण आता एक

गोष्ट तुला कबूल करावी लागेल, की इथे ह्या शेट्यांच्या गावात तू आलास तो केवळ माझ्यामुळे!"

"हो, हो, अगदी खरं आहे ते." पप्पू म्हणाला, "केवळ तुझ्यामुळे हे सारं झालं. पण तुला आता एक गोष्ट सांगतो. आपले मास्तर तुझ्या-बद्दल मला नेहमी म्हणायचे, 'पप्पू, तू त्या चंदूच्या नादी मुळीच लागू नकोस. तो उनाड आहे आणि एके दिवशी तो तुला गोत्यात आणील!'"

"मला माहीत आहे ते सारं!" चंदू म्हणाला, "मास्तरांचा माझ्यावर दातच होता. उगीच्चच रागवायचे माझ्यावर. पण जाऊ दे, आता कशाला आपल्याला त्यांची पर्वा! आपण अगदी मजेत आहोत इथे."

"हो, हो. खरं आहे तुझं म्हणणं." पप्पू म्हणाला.

आणि अशा रीतीने एकामागून एक असे पाच महिने गेले, अगदी निव्वळ खेळण्यात आणि हुंदडण्यात. अभ्यासाचे मुळी नावच नाही. आणि मग एके दिवशी सकाळी पप्पू उठला, तेव्हा तो चांगलाच बावर-लेला होता. का? माहीत आहे? पण मी ते तुम्हांला पुढल्या प्रकरणातच सांगेन.

## २२

एकामागून एक असे पाच महिने त्या शेट्यांच्या गावात केवळ हुंदडण्यात गेल्यावर, एके दिवशी सकाळी पप्पू उठला तेव्हा तो चांगलाच बावरलेला होता. कारण त्या

दिवशी सकाळी उठून तो आपले डोके खाजवू लागला, तेव्हा त्याला असे आढळले, की आपले कान खूपच लांब झालेले आहेत. आपले कान किती लांब झाले आहेत हे पाहाण्याकरिता तो आरसा शोधू लागला, पण आरसा काही त्याला कोठे मिळेना. तेव्हा त्याने पाण्याने भरलेल्या एका बालडीतच आपला चेहरा पाहिला. तेव्हा त्याला असे दिसले, की त्याचे कान अगदी गाढवाच्या कानांएवढे लांब झाले आहेत!

आपल्याला गाढवाच्या कानाएवढे लांब कान फुटले आहेत हे पाहिल्यावर पप्पू रडू लागला, डोकं भिंतीवर आपटून घेऊ लागला. पण जो जो पप्पू जास्त रडू लागला. तो तो त्याचे कान जास्त जास्तच लांब होऊ लागले, एवढेच नव्हे, तर त्याच्या कानांच्या टोकांना केससुद्धा आले!

पप्पूच्या रडण्याचा आवाज ऐकून एक छोटीशी खार त्याच्या जवळ आली. तिने पप्पूला विचारले, "काय झालं तुला?"

"मला बरं वाटत नाही. ताप आल्यासारखा वाटतोय." पप्पूने उत्तर दिले.

"असं? पाहू तुझी नाडी. मला थोडीशी वैद्यकी कळते." खार म्हणाली आणि ती पप्पूला तपासू लागली. काही वेळाने आपली तपासणी आटोपल्यावर खार म्हणाली, "तुला एक अगदी वेगळ्या प्रकारचा ताप आला आहे."

"वेगळ्या प्रकारचा ताप?" पप्पूने भीतीने विचारले, "सांग, सांग, मला कसला ताप आला आहे तो!"

"तुला 'गाढव ताप' आला आहे!" ती खार म्हणाली. पप्पू जिवाचे कान करून ऐकू लागला. "आता दोनतीन तासांतच तुला गाढवाचे सारे अवयव प्राप्त होतील." ती खार पुढे सांगू लागली, "तुला गाढवासारखे पाय येतील.
लांब कान तर आता आलेले आहेतच. थोड्या वेळाने शेपूटसुद्धा येईल."

खारीचे हे बोलणे ऐकून पप्पू अधिकच खिन्न झाला आणि तो पुन्हा

हुंदके देऊ लागला. हे पाहून ती खार म्हणाली, "अरे आता रडून काय होणार? तुझ्या हातानेच तू हे सारं घडवून आणलं आहेस! मोठमोठ्या पुस्तकांतून अगदी साफ लिहून ठेवलं आहे, की जी मुलं शाळेत जात नाहीत, अभ्यास करीत नाहीत आणि आपला सारा वेळ खेळण्यातच घालवतात, ती पुढे-मागे गाढवंच होतात. आता रडण्यात मुळीच अर्थ नाही. ह्याबाबत तू अगोदरच विचार करायला हवा होतास!"

"पण ह्यात माझा मुळीच दोष नव्हता, खारूताई!" पप्पू गयावया करून सांगू लागला, "मी अगदी खरं सांगतो, मी इथे यायला मुळीच तयार नव्हतो. त्या चंदूने मला आणलं."

"कोण हा चंदू?" खारीने विचारले.

"चंदू हा माझा मित्र." पप्पूने उत्तर दिले. "त्यानेच मला इथे आणलं. मी घरी परत जाणार होतो, मला शाळेत जायचं होतं, अभ्यास करायचा होता. पण चंदू म्हणाला, 'कशाला अभ्यास पाहिजे? काही जरूर नाही शाळेत जायची. तू माझ्याबरोबरच शेट्यांच्या गावी चल. तिथे आपल्याला अभ्यास करायला लागायचा नाही.' आणि तो मला इथे ह्या शेटयांच्या गावात घेऊन आला."

"मग आपल्या उनाड मित्राचं ऐकल्याबद्दल तुला ही गाढव व्हायची शिक्षा भोगायलाच हवी!" आणि एवढं बोलून ती खार निघून गेली.

काही वेळाने पप्पू बाहेर जायचा विचार करू लागला आणि तो दरवाजाजवळ गेला देखील. पण तितक्यात त्याला त्याच्या लांब कानांची आठवण झाली. तेव्हा त्याने एक मोठी पिशवी आपल्या कानांवरून ओढून घेतली आणि तो चंदूला शोधण्याकरता म्हणून बाहेर पडला.

पप्पूने चंदूला सर्वत्र शोधले, पण तो काही त्याला कोठे दिसला नाही. शेवटी पप्पू एक घराजवळ आला आणि त्याने दारावर टक्‌टक् केले.

"कोण आहे?" आतून चंदूने विचारले.

"मी पप्पू. दार उघड." पप्पू म्हणाला.

"थांब जरा बाहेर." चंदू म्हणाला.

जवळजवळ अर्ध्या तासाने चंदूने दार उघडले आणि पप्पू आत आला, तेव्हा त्याने तेथे जे पाहिले ते विचित्र होते. चंदूसुद्धा त्याच्या-सारखीच एक मोठी पिशवी कानांवर ओढून तेथे बसला होता.

पप्पू मनात म्हणाला, 'बापरे, चंदूचे कानसुद्धा माझ्या कानांसारखे लांब झाले की काय?' पण आपल्या काहीच लक्षात आलेले नाही असे दाखवीत पप्पूने विचारले, "काय चंदू? कसं काय? ठीक आहे ना?"

"अगदी ठीक." चंदूने उत्तर दिले.

"अरे हे डोक्याला फडकं कशाला गुंडाळलं आहेस?"

"ते फडकं होय? डोकं दुखतंय. म्हणून बांधलं आहे." चंदू म्हणाला, "पण पप्पू, तू रे कशाला आपलं डोकं झाकून ठेवलं आहेस?"

"माझंसुद्धा डोकं दुखतंय" पप्पूने स्पष्टीकरण केले.

"चंदू, मला तुला एक गोष्ट विचारायची आहे." पप्पू पुढे म्हणाला, "हे बघ चंदू, आतापर्यंत तुझे कान कधी दुखले होते का रे?"

"नाही, मुळीच नाही." चंदूने उत्तर दिले. "आणि तुझे तरी दुखले होते का?"

"छे, छे, माझेही कान आतापर्यंत कधी दुखले नाहीत." पप्पू म्हणाला, "पण आज सकाळपासून मात्र ते फार दुखत आहेत!"

"माझेही कान आज सकाळपासूनच दुखत आहेत." चंदू म्हणाला.

"म्हणजे मग आपल्याला दोघांनाही एकच ताप आला वाटतं?" पप्पूने शंका प्रदर्शित केली.

"हो, तसंच दिसतं." चंदू म्हणाला.

"बरं चंदू, माझं एक ऐकतोस का? मला तुझे कान दाखवतोस का?" पप्पूने विचारले.

"दाखवतो. पण पप्पू, अगोदर तू मला तुझे कान दाखव."

"नाही, पहिल्यांदा तू दाखव." पप्पू.

"मी नाही, पहिल्यांदा तू." चंदू.

आणि मग हो–ना, हो–ना करता करता त्यांनी ठरवले, की दोघांनी एकदमच आपल्या कानांवरच्या टोप्या काढायच्या. मग एक–दोन–तीन म्हटल्यावर पप्पू–चंदूने आपल्या टोप्या हवेत भिरकावल्या. दोघांनी जेव्हा पाहिले, की त्यांना गाढवाचे कान आले आहेत, तेव्हा मग ते एकमेकांचे कान ओढू लागले आणि शेवटी त्यांच्या ह्या चाळ्यांना इतका ऊत आला, की चंदू आणि पप्पू दोघेही मोठमोठ्याने हसू लागले. आणि अगदी खदखदून हसता हसता चंदू एकदम मध्येच थांबला आणि पप्पूला म्हणाला, "अरे पप्पू, मला धर, मला धर, मी पडतोय."

"काय बरं झालं चंदू?" पप्पूने घाबरून विचारले.

"अरे पप्पू, मला नीट उभं राहाता येत नाही." चंदू म्हणाला.

"आणि माझीसुद्धा तीच गत झाली आहे." पप्पू म्हणाला.

आणि ते असे बोलत असनाच त्यांचे एकदम दोन गाढवांत रूपांतर झाले आणि ते दोघेही खोलीत गरगर फिरू लागले.

पप्पूला आणि चंदूला गाढवासारखे पाय फुटले. शेपूट आले. तोंड आले. एवढेच नव्हे, तर ते दोघे गाढवासारखे ओरडूही लागले.

आणि त्यांचे ओरडणे चालू असतानाच दरवाजावर टक् टक् झाले आणि बाहेरून आवाज आला, "दरवाजा उघडा. मी गाडीवान आहे. उघडा दरवाजा लवकर. नाहीतर तुम्हांला शिक्षा करीन!" आणि क्षणभर काहीच उत्तर न आल्यामुळे तो गाडीवान दरवाजावर धक्के मारू लागला.

# २३

गाढवासारखे सारे अवयव प्राप्त झालेले पप्पू आणि चंदू खोलीचे दार उघडीत नाहीत असे पाहून गाडीवानाने दरवाजावर धक्के मारायला सुरुवात केली. काही वेळाने दरवाजा मोडून पडल्यावर गाडीवान आत येत म्हणाला, "वा, शाबास पोरांनो! अगदी गाढवं झालात तुम्ही! सहज बाहेरून चाललो होतो, तो तुमच्या ओरडण्याचा आवाज कानी पडला. म्हणून इथे आलो." असे म्हणून तो गाडीवान गाढव झालेल्या पप्पू आणि चंदूच्या जवळ गेला आणि त्यांच्या पाठीवरून हात फिरवून त्यांना स्वच्छ करू लागला.

त्या गाडीवानाचा असा विचार होता, की चंदू-पप्पूला बाजारात नेऊन विकावे, म्हणजे चांगले पैसे मिळतील. केवळ त्याच विचाराने तो त्या दोघांची सफाई करीत होता.

काही वेळाने आपले काम संपल्यावर त्या गाडीवानाने गाढव झालेल्या चंदू-पप्पूच्या गळ्यात दोरी बांधली आणि त्यांना घेऊन तो बाजरात निघाला.

बाजारात काही वेळ उभे राहिल्यावर त्या गाडीवानाची दोनही गाढवे,

म्हणजेच पप्पू आणि चंदू; तावडतोब विकली गेली. चंदूला एका शेतकऱ्याने विकत घेतले. दुसऱ्या एका माणसाने पप्पूला खरेदी केले. चंदूचे पुढे काय झाले, हे मला माहीत नाही. पण पप्पूचे पुढले आयुष्य मात्र मला नीट माहीत आहे.

पप्पूला विकत घेण्यात त्या माणसाचा एकच हेतू होता आणि तो म्हणजे त्याला गाढवाच्या कातड्याचा ढोल करायचा होता. म्हणूनच मग गाढवरूपी पप्पूला विकत घेतल्यावर तो माणूस नदीवर गेला. तेथे त्याने पप्पूच्या गळ्यात एक मोठा दगड बांधला आणि त्याला एक दोरी बांधून, आपण ती हातात धरून, तो किनाऱ्यावर बसला. त्यानंतर मग त्याने गाढवरूपी पप्पूला एकदम पाण्यात ढकलून दिले. गळ्यातल्या मोठ्या दगडामुळे पप्पू तत्काळ नदीच्या तळाशी गेला.

सुमारे अर्धा तासभर गाढवरूपी पप्पू पाण्याखाली राहिल्यावर त्याच्या मालकाला वाटले, की एव्हाना आपले गाढव मेले असेल. म्हणून मग तो आपल्या हातातील दोरी मोठ्या उत्साहाने वर खेचू लागला. त्याने सारी दोरी वर खेचली, तेव्हा त्याला काय दिसले असे तुम्हांला वाटते? त्या दोरीला मेलेल्या गाढवाऐवजी एक लाकडाचा कळसूत्री बाहुला बांधलेला दिसला. हा कळसूत्री बाहुला एखाद्या लहान माशासारखा तळमळत होता!

आपल्या हातातील दोरीला तो कळसूत्री बाहुला आलेला पाहाताच त्या माणसाला मोठे आश्चर्य वाटले. तो उद्गारला,

"अरे! माझं गाढव काय झालं?"

"मालक, मीच आपलं गाढव." त्या कळसूत्री बाहुल्याने—पप्पूच होता तो—उत्तर दिले.

"पण हे असं कसं शक्य आहे? गाढवाचं असं लाकडाच्या बाहुल्यात रूपान्तर कसं होईल?" त्या माणसाने विचारले.

बाळकोबाने पुन्हा डोळे चोळले आणि तो उद्गारला, "माझा पप्पू?"

"होय बाबा, मी तुमचाच पप्पू!" पप्पू म्हणाला, "मला विसरलात तुम्ही? किती किती चांगले होता तुम्ही बाबा! आणि मी? मी वेड्याने तुमचं काही ऐकलं नाही! पण बाबा, तुमचं न ऐकल्यामुळे माझ्यावर ...र काय संकटं कोसळली हे तुम्हांला सांगितलं, तर तुमचा विश्वास- तुम... बसणार नाही त्याच्यावर!"

पप्पू थोडा वेळ थांबला आणि मग त्याने घडलेली सारी हकीकत सांगायला सुरुवात केली :

"बाबा, त्या दिवशी मला शाळेला पाटी-पुस्तक आणण्याकरता म्हणून तुम्ही आपला एकुलता एक कोट विकलात, पण मी पाटी-पुस्तक घेऊन शाळेला न जाता बाहुल्यांचा खेळ पाहायला गेलो. त्या खेळातल्या लाकडी बाहुल्यांनी आणि मालकाने मला बरोबर ओळखलं. तो मालक तर मला चुलीतच घालणार होता, पण मी जेव्हा रडायला लागलो, तेव्हा त्याला माझी दया आली आणि त्याने मला पाच रुपये देऊन तुमच्याकडे जायला सांगितलं. मी घरी निघालो तो वाटेत मला कोल्होबा आणि मांजरीबाई भेटली. त्यांच्याबरोबर मी माझ्याजवळच्या पाच रुपयांचे पाचशे रुपये करण्याकरता म्हणून निघालो. आम्ही सारे, रात्र झाल्यामुळे एका खाणावळीत उतरलो. ठरल्याप्रमाणे मध्यरात्री खाणावळवाल्याने मला उठवलं आणि सांगितलं, की मांजरीबाई आणि कोल्होबा निघून गेली. तेव्हा मग मी तसाच रात्री बाहेर पडलो, तो काही वेळाने माझ्यामागे चोर लागले. त्यांना चुकवून मी पळत पळत नदी पार करून एका दयाळू परीच्या बंगल्यात गेलो...."

पप्पू क्षणभर थांबला आणि मग त्याने पुढे सांगायला सुरुवात केली :

"...त्या प्रेमळ परीने मला फार चांगलं वागवलं. आणि तिची परवानगी घेऊनच, तुम्हांला घेण्याकरता म्हणून, मी पुन्हा नदीकाठी आलो, तर मला तिथे पुन्हा कोल्होबा आणि मांजरी भेटली. त्यांच्या नादाने मी

पुन्हा माझ्याजवळच्या उरलेल्या चार रुपयांचे चारशे रुपये करण्याकरता म्हणून गेलो नि सारेच रुपये घालवून बसलो. त्या लबाड कोल्होबा-मांजरीनेच ते पैसे चोरले !

"पैसे गेल्यामुळे मी तिथेच खिन्न होऊन बसलो असताना एक कबूतर आलं आणि त्याने मला तुमचा पत्ता दिला, एवढंच नव्हे, त त्या कबुतराच्या पाठीवरूनच मी तुम्ही होता त्या जागी पोचलो. प त्या वेळेपर्यंत तुम्ही आपली होडी घेऊन खवळलेल्या समुद्रात गेल होतासुद्धा. मी तुम्हांला किनाऱ्यावरून हातही दाखवला, पण तुम् लाटांच्या तडाख्यात कुठे गडप झाला ते समजलंच नाही !"

पप्पूने आपली हकीकत संपवली आणि काही वेळ तो तसाच बाळकोबाच्या खांद्यावर मान ठेवून पडून राहिला. बाळकोबाही त्याला प्रेमाने थोपटत राहिला.

थोड्या वेळाने पप्पूने बाळकोबाला विचारले, "पण बाबा, तुम्ही ह्या देवमाशाच्या पोटात कसे आलात ?"

"अरे" पप्पू, बाळकोबा सांगू लागला, "मी त्या खवळलेल्या समुद्रात होडी ढकलली आणि काही वेळातच ती उलटून मी पाण्यावर पडलो. तेवढ्यातच हा देवमासा तिकडून जोरात आला आणि औषधाची गोळी गिळावी तसं त्याने मला गिळलं !"

"किती दिवस झाले ह्या गोष्टीला ?" पप्पूने विचारले.

"कुणास ठाऊक ! काय कळतंय ह्या देवमाशाच्या पोटात !" बाळकोबा म्हणाला.

"पण मग तुम्ही खातपीत काय होता ? हे टेबल इथे कसं आलं ? ही मेणबत्ती कशी आली ? ती पेटवायला तुम्हांला काड्याची पेटी कुणी दिली ?" पप्पूने बाळकोबावर प्रश्नांचा भडिमार केला.

"थांब, सारं सांगतो तुला." बाळकोबा म्हणाले. "जरा बैस इथे ह्या खुर्चीवर."

…जारच्या खुर्चीवर बसला आणि बाळकोबाने आपली हकीकत …ा सुरुवात केली :

…ा त्या देवमाशाने गिळल्यावर, तो देवमासा जोरात पोहत पोहत …ाला. असा किती वेळ गेला कुणास ठाऊक. पण मग त्या देव- … तोंड उघडल्यासारखं दिसलं आणि पुन्हा बंद झालं, तेव्हा मला दिसलं, की एक व्यापारी जहाजच त्या देवमाशाच्या पोटात आलं होतं. आता आपण ज्या टेबल-खुर्चीवर बसलो आहोत ना, त्या देवमाशाच्या पोटातील जहाजावरच्याच आहेत. ह्या जहाजावरचे खलाशी कुठे गेले कुणास ठाऊक! मी त्यांना खूप शोधलं, पण कुणीच कुठे दिसलं नाही. कदाचित आपलं जहाज बुडतं आहे असं पाहून, त्यांनी भराभर समुद्रात उड्या टाकल्या असतील. ह्या जहाजावर जे अन्नधान्य होतं ना, त्यावरच मी आजपर्यंत दिवस काढले. आता इथे काही शिल्लक नाही. त्यामुळेच मी असा टेबलावर डोकं टेकून बसलो होतो.—आता समजलं ना सारं तुला?"

"हो हो, सारं समजलं," पप्पू म्हणाला, "पण आता करायचं काय?"

"काय करणार आपण!" बाळकोबाने विचारले, "ही आता शेवटची …णबत्ती संपली, की काळोखात गप्प बसायचं मरणाची वाट पाहात!"

"नाही, असं नाही बाबा!" पप्पू म्हणाला, "आपण ह्यावर काही मार्ग काढला पाहिजे. आता असं करू या आपण. ह्या देवमाशाच्या तोंडातून बाहेर पडू या आणि समुद्रात पोहू या."

"अरे पप्पू, तुझी गोष्ट निराळी. तुला पोहता तरी येतंय, मला तेसुद्धा येत नाही." बाळकोबा म्हणाला.

"नाही तर नाही आलं तुम्हांला पोहायला." पप्पू म्हणाला. "मी पाठीवर घेतो तुम्हांला, म्हणजे झालं की नाही?"

"मला पाठीवर घेऊन पोहणार तू?" बाळकोबाने आश्चर्याने विचारले.

"अरे पप्पू, तू एवढासा आणि मी...."

"काही बोलू नका आता बाबा तुम्ही," पप्पू म्हणाला, "म
तसंच करा. चला माझ्याबरोबर."

मग बाळकोबा काही बोलायची वाट न पाहाता पप्पूने टेब
मेणबत्ती उचलली आणि तो देवमाशाच्या तोंडाच्या दिशेने जाऊ
बाळकोबाही अगदी निमूटपणे त्याच्या मागोमाग जाऊ लागला.

बराच वेळ असे चालल्यावर पप्पू आणि बाळकोबा त्या देवमाश
गळ्याजवळ येऊन ठेपले. पप्पू तेथे थबकला. त्याने आजूबाजूची
नीट पाहिली आणि तेथून आता बाहेर समुद्रात उडी मारायला
संधी मिळते, ह्याचीच तो वाट पाहू लागला.

पप्पूला, बाळकोबाला आणि व्यापारी जहाजाला गिळणारा हा देव
फार म्हातारा झाला होता आणि आता त्याला दमाही लागला ह
त्यामुळेच हा देवमासा श्वास घेण्याकरता मधून मधून क्षणभर तोंड उ
ठेवी. पप्पूने हे सारे नीट पाहून ठेवले आणि तो बाळकोबाच्या का
कुजबजला, "आता ह्या देवमाशाने तोंड उघडलं, की आपण
उडी मारायची. तुम्ही मला नीट धरून ठेवा."

बाळकोबाने पप्पूला घट्ट धरले. काही वेळाने श्वास घेण्याकरता
देवमाशाने तोंड उघडले, तेव्हा ही संधी साधून पप्पूने बाळकोबा
त्याच्या तोंडातून समुद्रात उडी मारली आणि तो वाऱ्याच्या वेगाने
लागला.

BVBK-0402263